# महाराष्ट्र विधानपरिषद

## पाचवे अधिवेशन, २०१६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक ०७ डिसेंबर, २०१६ / अग्रहायण १६, १९३८ ( शके )**

**(१) मुख्यमंत्री**
**(२) गृहनिर्माण मंत्री**
**(३) कामगार, कौशल्य विकास, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री**

**यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ८६**

---

**पाथरी (जि.परभणी) येथील विकास कामांसाठी निधी उपलब्ध करुन देणेबाबत**

**(१) * २४५१६ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाथरी (जि.परभणी) येथील साईबाबांच्या जन्मभूमीतील विकास कामांसाठी वैशिष्टयपुर्ण योजनेकरिता रुपये ५ कोटींचा निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान मा. मुख्यमंत्री यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, साईबाबांच्या जन्मभूमीच्या विकासासाठी वैशिष्टयपुर्ण योजनेतून पाथरी नगर परिषदेस आर्थिक मदत उपलब्ध करून देण्यात आली आहे काय,

(३) नसल्यास, आर्थिक मदत उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) नाही.

(३) प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) निरंक.

-----------------

## ठाणे महानगरपालिकेच्यावतीने शहरात महिलांची कर्करोग पूर्व तपासणी करण्याच्या प्रस्तावाबाबत

**(२) * २४९०२ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिकेच्यावतीने शहरात विशेष शिबिरांच्या सहाय्याने महिलांची कर्करोग पूर्व तपासणी करण्याचा प्रस्ताव विचाराधीन असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावाला ठाणे महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची मंजूरी घेवून त्याबाबतची निविदा प्रक्रिया पुर्ण करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासन ही मोहिम राबविण्यासाठी निधी उपलब्ध करुन देणार आहे काय, तसेच उक्त मोहिम राज्यभर राबविण्यात येणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) सदर प्रकल्प ठाणे महानगरपालिका स्वनिधीतून राबविणार असल्याने प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे येथे भोगवटा प्रमाणपत्र (ऑक्युपन्सी सर्टिफिकेट) नसलेल्या मिळकतींसाठी राबविलेल्या अभय योजनेबाबत

**(३) * २४७४७ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथे भोगवटा प्रमाणपत्र (ऑक्युपन्सी सर्टिफिकेट) नसलेल्या मिळकतींसाठी अभय योजना राबविल्यास उत्पन्नात वाढ होईल हा पुणे महानगरपालिकेचा दावा फोल ठरला असून या योजनेत आतापर्यंत अवघे रुपये १ कोटी, ३३ लाख, १० हजार, ५५७ महानगरपालिकेकडे जमा झाले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्यक्षात कायदा व नियमानुसार दंड आकारणी झाली असती तर महानगरपालिकेला रुपये ४०० कोटी उत्पन्न मिळाले असते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अभय योजनेत सर्वसामान्य सदनिकाधारकांचे हित न होता फक्त मोजक्याच बांधकाम व्यावसायिकांचे हित साधल्याचेही स्पष्ट झाले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.

पुणे महानगरपालिकेने दिनांक ३१ डिसेंबर, २०१२ पुर्वीच्या प्रकरणांसाठी अभय योजना राबविली असून या योजनेचा कालावधी दिनांक २६ एप्रिल, २०१६ पासून २५ ऑक्टोबर, २०१६ पर्यंत (६ महिने) एवढा होता. या कालावधीत विना वापर भोगवटापत्रासाठी अभय योजनेंतर्गत लागू केलेल्या योजनेच्या काळात रक्कम रुपये १०,०४,४२,९७५/- (अक्षरी रुपये दहा कोटी चार लाख बेचाळीस हजार नऊशे पंच्याहत्तर मात्र) इतकी रक्कम महानगरपालिकेकडे जमा झाली आहे.

अभय योजने अंतर्गत सदनिकास भोगवटापत्र दिल्याने मिळकत कर आकारणी होवून महापालिकेच्या महसुलात वाढ झाली आहे.

(२) व (३) सदरची अभय योजना ही सर्व घटकांसाठी राबविण्यात आलेली आहे. विहित कालावधीसाठी सदर योजना राबविण्यात आल्याने ज्यांनी लाभ घेतला त्यांचेकडून उक्त रक्कम महानगरपालिकेकडे प्राप्त झाली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मंगरुळपीर व कारंजा (जि.वाशिम) या शहरांच्या हद्दवाढीच्या प्रस्तावाबाबत**

**(४) * २५७९९ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगरुळपीर व कारंजा (जि.वाशिम) या शहरांच्या हद्दवाढीचा परिपूर्ण प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे, तसेच या प्रस्तावावर प्रत्यक्षात अंमलबजावणी केव्हापर्यंत होण्याचे अपेक्षित आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) वाशिम जिल्हयातील मंगरुळपीर नगरपरिषदेच्या हद्दवाढीबाबतचा परिपूर्ण प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नाही.

कारंजा नगरपरिषदेच्या हद्दवाढीबाबत जिल्हाधिकारी वाशिम यांच्याकडून प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने ग्रामविकास विभागाचे अभिप्राय प्राप्त करुन यथाशिघ्र नियमानुसार निर्णय घेण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कन्हान (जि.नागपूर) नगरपरिषदेकडून दुषित पाणीपुरवठा होत असल्याबाबत**

**(५) * २५२१७ प्रा.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कन्हान (जि.नागपूर) नगरपरिषदेकडून १ महिन्यापासून रामनगर, गणेशनगर, रोहिया ले-ऑऊट, हनुमानगर, इंदिरानगर, शिवनगर, जवाहरनगर या परिसरात दुषित पाण्याचा पुरवठा होत असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असल्याचे दिनांक २७ जुलै, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शुध्द पाणीपुरवठा करण्याकरिता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच, सदर दुषित पाणीपुरवठा करणाऱ्या नगरपरिषदेवर शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) कन्हान नगरपरिषदेच्या परिसरात दिनांक २७ जुलै, २०१६ रोजी अतिवृष्टी झाल्यामुळे कन्हान नदीस पूर आला होता. त्यामुळे फक्त त्यादिवशी गढुळ पाण्याचा पुरवठा होत असल्याची बाब निदर्शनास येताच तात्काळ पाणीपुरवठा बंद करण्यात आला.

योग्य व्यवस्थापन करून दिनांक २८ जुलै, २०१६ पासुन सदर भागास शुध्द पाण्याचा पुरवठा करण्यात येत आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाच्या नोकर भरतीबाबत**

**(६) * २४०१६ प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.रामराव वडकुते, श्री.सतिश चव्हाण, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कमांड सेंटर, बोरीवली, मुंबई येथे महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाच्या भरती प्रक्रियेत उमेदवारांची चाचणी सुरु असताना जंपिंग सीट या चाचणी दरम्यान १२ उमेदवार जखमी झाले असून त्यापैकी २ जणाचे पाय फ्रॅक्चर झाल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू अटीमुळे २०० हून अधिक तरुण जखमी झाले असल्याने राज्य मानवी हक्क आयोगाने महापालिकेला नोटीस बजावून दिनांक २८ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास यासंदर्भातील अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू आदेशानुसार महापालिकेने अहवाल सादर केला आहे काय, या घटनेस जबाबदार असणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) कमांड सेंटर, बोरीवली, मुंबई येथे दिनांक १९ ऑगस्ट, २०१६ ते दिनांक ७ सप्टेंबर, २०१६ या कालावधीत झालेल्या अग्निशमन दलाच्या भरती प्रक्रियेत एकूण १४,९१२ उमेदवारांनी भाग घेतला होता.

त्यापैकी २७ उमेदवारांच्या पायाला फ्रॅक्चर झाल्याचे रुग्णालयाच्या अहवालावरुन दिसून आले आहे.

(२) यासंदर्भात राज्य मानवी हक्क आयोगाने महानगरपालिकेला नोटीस बजावून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत, हे खरे आहे.

(३) महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग यांच्याकडून प्राप्त झालेल्या नोटीसला महानगरपालिकेमार्फत दिनांक २८ सप्टेंबर, २०१६ रोजी अहवाल सादर करण्यात आला आहे.

सदर भरती प्रक्रियेत उडी मारतेवेळी मार लागण्याचे मुख्य कारणे हे त्या उमेदवाराने उडी कशी प्रकारे मारावी याबाबत देण्यात आलेल्या सूचनांचे पालन न करणे व घाबरणे ही आहेत.

त्यामुळे सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात आलेली नाही.

तथापि, यापुढे असे अपघात टाळण्यासाठी, अग्निशमन दलामध्ये भरती प्रक्रियेपूर्वी उमेदवारांना उडी मारण्याचे प्रशिक्षण देण्याच्या सूचना बृहन्मुंबई महानगरपालिकेस देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मोहोने (जि.ठाणे) येथील एन.आर.सी.लि. या कंपनीतील कामगारांची प्रलंबित देणी अदा करण्याबाबत**

**(७) * २४३३० श्री.जयवंतराव जाधव : तारांकित प्रश्न क्रमांक १९६०४ ला दिनांक ३ ऑगस्ट, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहोने (जि.ठाणे) येथील एन.आर.सी.लि. या कंपनीची ३३९ एकर जमीन विकासकाला विकण्यासाठी टाळेबंदी लागू केल्यामुळे कामगारांचे ८२.४७ कोटी रुपयांचे देणी प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार कामगारांची प्रलंबित देणी अदा करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) कंपनीने दिनांक १५/११/२००९ पासून टाळेबंदी लागू केली असून कामगारांची रु.८२.४७ कोटी इतकी देणी प्रलंबित आहेत, हे खरे आहे.

(२) होय,

चौकशीअंती असे निदर्शनास आले आहे की, एन.आर.सी.लि.या व्यवस्थापनेने कारखाना चालविण्याकरीता आवश्यक निधी उपलब्ध करण्याकरीता मे.रहेजा युनिव्हर्सल प्रा.लि. या विकासकाबरोबर जमीन विक्री करार करुन अंशत: निधी प्राप्त केला होता. परंतु बीआयएफआरने त्यांचे परवानगीशिवाय कंपनीच्या कोणत्याही मालमत्तेची विक्री करण्यास प्रतिबंध केल्याने व सदर आदेश एएआयएफआरने कायम केल्याने कंपनीस पूर्ण निधी उपलब्ध झाला नाही. तथापि, दिनांक ५/९/२००८ रोजी व्यवस्थापन व एन.आर.सी. मजदूर संघ या कामगार संघटनेबरोबर केलेल्या करारानुसार Early Retirement Scheme (ERS) अंतर्गत व्यवस्थापनाकडे पहिल्या टप्प्यात प्राप्त झालेल्या ६५० कामगारांच्या अर्जापैकी १२२ कामगारांना रु. ३,७४,८५,१२७/- इतक्या रकमा अदा करण्यांत आलेल्या असून, ५२८ कामगारांचे अर्ज अजून प्रलंबित आहेत. तसेच कामगारांना देणी मिळवून देण्याकरिता शासनाच्या विविध स्तरावर वेळोवेळी बैठका घेण्यात आल्या आहेत.

सद्य:स्थितीत प्रकरण बीआयएफआर समोर प्रलंबित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई शहरातील अंमलीपदार्थाच्या विक्रीस प्रतिबंध घालणेबाबत**

**(८) * २४७८८ श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहराच्या अनेक भागात अंमलीपदार्थाची सर्रास विक्री होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विक्रोळी (मुंबई) येथील पार्कसाईट परिसरात अनेक ठिकाणी अंमली पदार्थांचे अड्डे असून स्थानिकांनी याबाबत तक्रारी करुनही स्थानिक पोलीस प्रशासनाकडून अंमलीपदार्थाच्या अड्ड्यांकडे दुर्लक्ष करीत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई शहरात अंमलीपदार्थाचा व्यापार वाढत असून छुप्या मार्गाने होणारी अंमलीपदार्थाची विक्री रोखण्यासाठी आणि गर्दुल्याचे वाढते अड्डे उद्ध्वस्त करण्याबाबत तसेच दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही. हे खरे नाही.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) यासंदर्भात कडक कारवाई करण्यात येत असून, जानेवारी, २०१६ पासून आजपावेतो अंमली पदार्थांचे सेवन करणाऱ्या एकूण १३०६५ इसमांविरुध्द कार्यवाही करुन १९० आरोपींविरुध्द केसेस करण्यात आल्या आहेत. तसेच एकूण १४६४ कि.ग्रा. अंमली पदार्थ जप्त केले. तसेच पार्कसाईट, विक्रोली या परिसरात सन २०१५ मध्ये ६ आरोपींना अटक करुन त्यांचेकडून ६.५५० किलो गांजा, २० ग्राम कोकेन, २५ ग्रॅम एम.डी. हस्तगत करण्यात आले आहे.

ड्रगचे प्रमाण कमी करण्यासाठी विविध कार्यक्रम हाती घेण्यात आलेले आहेत, अंमली पदार्थ विरोधात शाळा, महाविद्यालये इत्यादी ठिकाणी तसेच सार्वजनिक उत्सवामध्ये (उदा. दहिहंडी, गणेशोत्सव, नवरात्रौत्सव) व अंमली पदार्थ विरोधी पंधरवड्यात सामाजिक संस्थांच्या मदतीने विविध कार्यक्रमाद्वारे जनजागृती केली जाते. तसेच वेगवेगळ्या एन.जी.ओ. संस्थाच्यावतीने व्यसनाधीन इसमांवर/ मुलांवर उपचार करण्यात येतात. तसेच २६ जून हा अंमली पदार्थ विरोधी दिन म्हणून पंधरवाडा साजरा करण्यात येतो. यावर्षी सदर पंधरवाड्यात अंमली पदार्थाच्या दुष्परिणामाबाबत माहिती देण्यात आली व जनजागृती निर्माण होण्यासाठी बिकेसी या ठिकाणी एन.सी.बी.च्या सहकार्याने मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात महिला अत्याचाराच्या घटनांना प्रतिबंध घालणेबाबत**

**(९) * २३६०६ श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.रामराव वडकुते, श्री.सतिश चव्हाण, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभागाने (एन.सी.आर.बी) त्यांचा सन २०१५ चा गुन्हा नोंदणी अहवाल दिनांक ३० ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास जाहीर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अहवालात महाराष्ट्र राज्यात सन २०१५ मध्ये महिला विनयभंगाच्या ११ हजार ७१३ घटनांची तर बलात्काराच्या ४ हजार १४४ घटना घडल्याचे नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महिला विनयभंग प्रकरणात महाराष्ट्र राज्य देशात प्रथम क्रमांकावर गेल्यामुळे महिलांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे, तसेच बलात्कार घटनेतील दोषींना कठोर शासन करावे या मागणीसाठी राज्यभर मोठे मोर्चे निघत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, महिलांच्या सुरक्षिततेबाबत आणि गुन्हयांचे प्रमाण कमी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) उपरोक्त प्रकरणी किती प्रकरणे अती जलद न्यायालयाकडे वर्ग केली आहेत व त्याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय,

(२) होय,

(३) अंशत: खरे आहे.

राष्ट्रीय गुन्हे नोंदणी अहवाल (एनसीआरबी) २०१५ नुसार देशात महिला विनयभंगाच्या सर्वात जास्त गुन्हयांची नोंद महाराष्ट्रात असल्याचे नमूद आहे. परंतु लोकसंख्येच्या प्रमाणात सदर गुन्हयाच्या नोंदीचे प्रमाण पहाता महाराष्ट्र हा ९ व्या क्रमांकावर आहे.

(४) सदर गुन्हे रोखण्यासाठी सर्व पोलीस घटकांना पोलीस मित्रांचा जास्तीत जास्त सहभाग घेऊन गुन्हेगारीस आळा घालण्याच्या सुचना दिले आहेत. पोलीस मित्रांकरीता मोबाईल ॲप तयार करण्यात आले आहे. पोलीस गस्त वाढ करण्यात आले आहे. महिलांच्या सुरक्षेसाठी सर्व पोलीस घटकांना मोबाईल ॲप तयार करण्याच्या सूचना दिले आहेत. विनयभंगाच्या गुन्हयात दोषारोपपत्र २४ तासांच्या आत दाखल करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत, गर्दीचे ठिकाणी, शाळा, महाविद्यालय, धार्मिक स्थळे येथे सी.सी.टी.व्ही. बसविण्यात आले आहेत, जनजागृती शिबीर केले जात आहे, शाळा, कॉलेज येथे कायदेविषयक व वाहतूक नियमाविषयक माहिती दिली जाते, अवैध शस्त्र बाळगणाऱ्यावर कठोर कारवाई करण्याबाबत सर्व घटक प्रमुखांना कळविण्यात आले आहे, महिलांसाठी टोल फ्री हेल्पलाईन नं.१०३ व १०९१ तयार करण्यात आले आहे, महिला सुरक्षा समिती व महिला सहाय्य कक्ष तसेच महिला अत्याचार प्रतिबंधक कक्ष इ.ची स्थापना करण्यात आली आहे, महिलांवरील अत्याचाराची प्रकरणे निकाली काढण्यासाठी २७ विशेष न्यायालयांची स्थापना केली आहे.

(५) बलात्काराच्या घटनांमधील दिनांक २४/११/२०१६ पर्यत एकूण ९४० खटले जलदगती न्यायालयाकडे वर्ग करण्यात आलेले आहेत.

-----------------

## सांगोला (जि.सोलापूर) येथील टाऊन हॉलची दुरुस्ती करणेबाबत

**(१०) * २५५७३ श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगोला (जि.सोलापूर) नगरपालिकेने सुमारे दहा ते बारा वर्षापूर्वी दोन कोटी रुपये खर्च करुन उभारलेल्या पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर स्मृतीभवन टाऊन हॉल गेल्या काही महिन्यापासून नादुरुस्त असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने निर्णय घेवून सदर स्मृती भवनाच्या दुरुस्तीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर स्मृतीभवन टाऊन हॉलचे खराब झालेले पत्रे दुरूस्तीकरीता दिनांक ३०/०६/२०१६ रोजीच्या सर्वसाधारण सभेच्या ठराव क्र.२१ अन्वये मंजुरी प्राप्त झाली असून त्यानूसार दिनांक १६/०९/२०१६ अन्वये नगरपरिषदेने ठेकेदारास कामाचा कार्यादेश दिला. सदर काम दि.१६/११/२०१६ रोजी पूर्ण झाले असुन सदर स्मृतीभवन सुस्थितीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नंदुरबार नगरपरिषदेने बांधलेल्या घरकुलांचा अपात्र लोकांनी बेकायदेशीर ताबा घेतल्याबाबत

**(११) * २४६६७ श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार नगरपरिषदेने आयएचएसडीपी योजनेंतर्गत बांधलेल्या घरकुलांचा अपात्र लोकांनी बेकायदेशीर ताबा घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुख्याधिकारी व जिल्हा प्रशासनाच्या ही बाब निदर्शनास आल्यानंतरही कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी अपात्र लोकांना तात्काळ बाहेर काढून घरे खाली करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) व (३) जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षक यांचेसह संबधितांची दिनांक २१ नोव्हेंबर, २०१६ रोजी जिल्हास्तरावर बैठक आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीत बेकायदेशीर ताबा घेतलेल्या अपात्र लाभार्थ्यांकडून घरकुले खाली करण्याबाबत कार्यवाहीकरिता सूचना देण्यात आल्या आहेत.

अपात्र लाभार्थ्यांकडून घरकुले रिकामी करुन घेण्याची कार्यवाही दिनांक ३१ डिसेंबर, २०१६ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी, नंदूरबार यांना दिलेले आहेत
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्हयातील होटगी रोडवरील विमानतळाच्या जागेवर अतिक्रमण झाल्याबाबत

**(१२) * २३९३१ श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्हयातील होटगी रोडवरील विमानतळाच्या ३६५ एकर जागेपैकी ४० एकर जागेवर अतिक्रमण झाल्याने विमानसेवेस अडचणी निर्माण झाल्या असून विमानतळाच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात काही स्थानिक सामाजिक संस्थांनी जिल्हाधिकारी, सोलापूर यांना लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्याअनुषंगाने शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.
(२) या अतिक्रमणाच्या संबंधी मा.आमदार, माजी उपमहापौर व इतर राजकीय पदाधिकारी यांनी लेखी निवेदने/ अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयाकडे दिले आहेत.

(३) हे प्रकरण मा.उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे. मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**यवतमाळ येथील जवाहरलाल दर्डा या विमानतळाच्या विकासाबाबत**

**(१३) * २४६९१ श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ येथील जवाहरलाल दर्डा विमानतळ सर्वात जुने असून शासनाने या विमानतळाच्या विकासाबाबत रिलायन्स कंपनी सोबत करार केला आहे, परंतु गेल्या काही वर्षात रिलायन्स कंपनीने अपेक्षित विकास केला नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने निर्णय घेऊन विमानतळ रिलायन्स कंपनीकडून ताब्यात घेऊन झालेला करार रद्द करावा आणि केंद्र शासनाच्या विकास योजनेंतर्गत पहिल्या टप्प्यातील विमानतळाच्या यादीत समावेश करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१), (२) व (३) मे.यवतमाळ एअरपोर्ट प्रा.लि. (रिलायन्स ग्रुप) यांना आधुनिकीकरण अर्थसहाय्य विकास व देखभाल व दुरुस्ती वापर आणि व्यवस्थापक हस्तांतरण या अटी व शर्ती नुसार महामंडळाने सदर कंपनीसोबत दिनांक ३१ ऑक्टोबर, २००९ रोजी ९५ वर्षासाठी करारनामा केलेला आहे. सदर विमानतळामध्ये कंपनीने अभ्यागत कक्ष निर्माण केला असून विमान कंपन्याना प्रवासी मिळत नसल्यामुळे विकासाची पुढील कामे होवू शकली नाहीत. सदर विमानतळासंबंधी मे.यवतमाळ एअरपोर्ट प्रा.लि. (रिलायन्स ग्रुप) या कंपनीसोबत करण्यात आलेल्या करारनाम्यातील अटी व शर्ती तपासून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## नवी मुंबई येथील सीवूड परिसरातील फायनान्स कंपनीवर पडलेला दरोडा

**(१४) * २३५१८ श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई येथील सीवूड परिसरातील फायनान्स कंपनीवर दरोडा टाकून २ किलो सोने व ९ लाख रुपये रोख रक्कम लुटून नेल्याची घटना दिनांक ७ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार सदर घटनेत लुटून नेलेला ऐवज व रोख रक्कम हस्तगत करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नवी मुंबईतील सीवूड परिसरातील पॉप्युलर फायनान्स कंपनीवर दरोडा टाकून कंपनीचे कार्यालयातील सुमारे ६,६९,३२,०००/- रुपये किंमतीचे २१ किलो ९९३ ग्रॅम ९०० मिलीग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम रुपये ९,५०,०००/- लुटून नेल्याची घटना घडली आहे.

(२) सदर प्रकरणी फिर्यादीचे तक्रारीवरुन सहा आरोपींविरुध्द एनआरआय सागरी पोलीस ठाणे, नवी मुंबई येथे गु.र.नं.१६९/१६ भां.द.वि. कलम ३९५, ३९७, १२० (ब), ४११, ४१४ सह आर्म ॲक्ट ३, २५ सह मपोका ३७(१), १३५, महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा, १९९९ कलम ३(१) (II), ३(२), ३(४) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील सहा आरोपींना अटक करण्यात आली असून अटक आरोपीकडून रुपये ४४,९९,३१०/- किंमतीचे १४९१ ग्रॅम ०४९ मिलीग्रॅम सोन्याचे दागिने रुपये १,५२,०५०/- रोख रक्कम, एक चार चाकी गाडी आणि एक पिस्टल व ६ जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली आहेत. तसेच सदर गुन्ह्याच्या तपासादरम्यान अटक आरोपीव्यतिरीक्त आणखी ५ आरोपी सदर गुन्ह्यात सहभागी असल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर पाच आरोपींना अटक करण्याची कार्यवाही चालू आहे. गुन्हा तपासावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे उंबर्डे (ता.कल्याण, जि.ठाणे) येथे आय.टी.आय प्रशिक्षण केंद्र सुरु करण्याबाबत**

**(१५) * २५१०६ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) मौजे उंबर्डे (ता.कल्याण, जि.ठाणे) येथे आय.टी.आय प्रशिक्षण केंद्रासाठी कोट्यवधी रुपये खर्च करुन बांधलेल्या इमारतीचा वापर होत नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्रातील सुशिक्षित उमेदवारांना प्रशिक्षणाचा फायदा व्हावा याद्दष्टीने सदर केंद्रात प्रशिक्षण सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) अंशत: खरे आहे.

मौजे उंबर्डे, कल्याण पश्चिम (जि.ठाणे) संस्थेच्या इमारतीचे बांधकाम जरी पुर्ण असले, तरीही विद्युतीकरणाचे काम अपुर्ण आहे. संस्थेस पाण्याचे कनेक्शन अद्याप मिळालेले नाही. संरक्षण भिंतीचे काम ३ बाजुंनी ७५ टक्के पुर्ण असून एका बाजुचे काम अपुर्ण आहे. भूखंडाचे सपाटीकरण अपुर्ण अवस्थेत आहे. आवारातील अंतर्गत रस्ते व पथदिवे यांची व्यवस्था झालेली नाही. सदर अपुर्ण कामांमुळे संस्थेचा ताबा घेणे शक्य झालेले नाही.

(२) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मौजे उंबर्डे, कल्याण पश्चिम (जि. ठाणे) ही संस्था सद्य:स्थितीत "शासकीय तांत्रिक विद्यालय, उल्हासनगर-०३" येथे कार्यरत असुन २०० प्रशिक्षणार्थी प्रशिक्षणाचा फायदा घेत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**येऊर (जि.ठाणे) येथील सुपर ड्रिम रिअल इस्टेट प्रा.लि. यांनी अनधिकृत बांधकाम केल्याबाबत**

**(१६) * २३४८१ श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येऊर (जि.ठाणे) येथील सर्व्हे नं.१२/२, ३ या भुखंडावर सुपर ड्रिम रिअल इस्टेट प्रा.लि. यांनी अनधिकृत बांधकाम केल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भूखंडावरील इमारतीचे नकाशे ठाणे महानगरपालिकेमार्फत मंजूर केलेले नसताना देखील या भूखंडावर महापालिकेतील अधिकारी व जिल्हाधिकारी कार्यालयातील काही अधिकाऱ्यांच्या संगनमताने विकासकाने या भूखंडावर अनियमितता केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विकासक व दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अशा स्वरुपाची तक्रार जिल्हाधिकारी, ठाणे यांना प्राप्त झाली होती.

(२) सदर भूखंडावरील इमारतीचे नकाशे ठाणे महानगरपालिकेने मंजूर केलेले नाहीत. या जागेवर कंपाऊंड वॉल, लोखंडी गेट व १७ x २० फुट आकाराचे पक्के बांधकाम केल्याचे जिल्हाधिकारी, ठाणे यांचे निदर्शनास आले.

(३) आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना या प्रकरणी चौकशी करुन तात्काळ अहवाल सादर करण्याबाबत सूचित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पवई, मुंबई येथील हिरानंदानी रुग्णालयातील किडनी प्रत्यारोपण गैरप्रकाराबाबत**

**(१७) * २३६६९ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पवई, मुंबई येथील हिरानंदानी रुग्णालयातील किडनी प्रत्यारोपण गैरप्रकारात मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेसह पाच डॉक्टरांचा सहभाग असल्याचे निदर्शनास आल्याने त्यांना अटक करण्यात आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदर डॉक्टरांना जामिन मिळाला असला तरी या गैरप्रकाराची चौकशी करण्याचा निर्धार पोलीस प्रशासनाने केला असल्याचे दिनांक १५ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार तपास सुरु करण्यात आला आहे काय, त्यात काय निष्पन्न झाले व तद्नुसार दोषींवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदरहू प्रकरणांची चौकशी संचालक तथा सामुचित अधिकारी, आरोग्य सेवा, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचेकडे चालू असून गुन्हयाचा तपास चालू ठेवण्यात आला आहे.
(३) वरील चौकशी प्रकरणी १५ अटक व ३ पाहिजे असे एकूण १८ आरोपींताविरुध्द मा.६६ वे न्यायालय अंधेरी यांचे न्यायालयात कोर्ट केस क्र.२७४३/१६, दिनांक ०१/१०/२०१६ रोजी अन्वये दोषारोप पत्र सादर करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबई महापालिकेच्या जी-उत्तर वॉर्डचे वरिष्ठ वसाहत अधिकारी बोगस कागदपत्रांच्या आधारे फोटोपास देत असल्याबाबत**

**(१८) * २५६५४ श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महापालिकेच्या जी-उत्तर वॉर्डचे वरिष्ठ वसाहत अधिकारी श्री.अशोक दत्तात्रय कोकाटे, वसाहत अधिकारी श्री.सुशीलकुमार गांगुर्डे हे बोगस कागदपत्रांच्या आधारे बोगस फोटोपास देत असल्याप्रकरणी दिनांक १३ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास शिवाजी पार्क पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या तक्रारीनुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक यांचेमार्फत या गैरप्रकाराची चौकशी सुरु असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कार्यालयात वसाहत अधिकारी म्हणून बदली होऊन आलेल्या श्री.महेंद्र पांडुरंग पवार यांनी माहिती अधिकार कार्यकर्ते श्री.रामशंकर सरोज यांना जी-उत्तर वॉर्डच्या ऑफिसमध्ये प्रवेशास बंदी करण्यात यावी अशी लेखी मागणी वॉर्ड ऑफिसर श्री.रमाकांत बिरादार यांचेकडे केल्याची बाबही निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोणत्याही प्रकारची चौकशी न करता माहिती अधिकार कार्यकर्ते श्री.रामशंकर सरोज यांना बाजू मांडण्याची संधी न देता शासकीय कार्यालयात येण्यास बंदी घालण्याची बेकायदेशीर मागणी करणाऱ्या वसाहत अधिकारी श्री.महेंद्र पवार यांचे विरोधात काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, वरिष्ठ वसाहत अधिकारी श्री.अशोक दत्तात्रय कोकाटे व श्री.सुशीलकुमार गांगुर्डे यांनी बोगस कागदपत्रांच्या आधारे बोगस फोटोपास देऊन कमाविलेल्या लाखो रुपयांचा तपास शिवाजी पार्क पोलीस ठाण्याने पूर्ण केला आहे काय, तपासाचे निष्कर्ष काय आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) वरिष्ठ वसाहत अधिकारी, जी/उत्तर वार्ड कार्यालयात माहिती अधिकार कार्यकर्ते श्री. रामशंकर सरोज हे वारंवार वेळी-अवेळी येऊन तक्रारी दाखल करणे, त्याबाबत विचारणा करणे, सकाळी ०८:०० ते संध्या ०५:३० यावेळेत केव्हाही कार्यालयात उपस्थित रहात होते. त्यामुळे कार्यालयीन कामकाजात अडचणी निर्माण होत असल्यामुळे, सहाय्यक आयुक्त, जी/उत्तर वार्ड यांचेकडे वरिष्ठ वसाहत अधिकारी यांचे कार्यलयामार्फत लेखी स्वरुपात कळविण्यात आले होते. त्यानुसार सहाय्यक आयुक्त जी/उत्तर वार्ड यांच्या आदेशान्वये रामशंकर सरोज यांना आठवडयातून सोमवार व शुक्रवार या दिवशी दुपारी ०३:०० ते ०५:०० या वेळेत येण्याबाबत सहाय्यक सुरक्षा अधिकारी, जी/उत्तर कार्यालयामार्फत सांगण्यात आले आहे.

(३) कार्यालयात प्रवेश करण्यास बंदी घालण्यात आलेली नाही.

(४) अद्याप चौकशी सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वैष्णव एन्टरप्रायझेस ही एजन्सी नांदेड महापालिकेचा एल.बी.टी. कर बुडवित असल्याबाबत**

**(१९) * २४७२७ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड शहरासह संपूर्ण जिल्ह्यात आय.टी.सी. कंपनी तथा इतर अनेक उपयोगी वस्तु विकणारे विक्रेता वैष्णव एन्टरप्रायझेस एजन्सीने महापालिकेचा एल.बी.टी. कर बुडवित असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत नांदेड महापालिकेकडे माहिती अधिकार कायद्यांतर्गत माहिती मागितली असता माहिती देता येत नसल्याचे लेखीपत्र महापालिकेने दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन एल.बी.टी. कराच्या रुपाने महसूल बुडविणाऱ्या उक्त कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) होय.

- माहितीचा अधिकार कायदा अधिनियम २००५ चे नियम ११(१) या अधिनियमान्वये कायद्याने संरक्षण दिलेल्या व्यवसायीक किंवा वाणिज्यक गुपीतांच्या बाबतीत ची माहिती प्रकट करता येत नाही.
- स्थानिक संस्था कर अधिनियम २०१० चे नियम ५२ च्या प्रयोजनार्थ दिलेल्या कोणत्याही बाबीच्या संदर्भात संबंधित व्यवसायीकाची कोणत्याही बाबीच्या संदर्भात संबंधित व्यवसायीकाची कोणतीही माहिती प्रकटन करता येत नाही म्हणून ती नाकारण्यात आली.

(३) संबंधिताचे सन २०१०-११ व २०११-१२ चे करनिर्धारण झालेले आहे व उर्वरीत वर्षाचे करनिर्धारण करण्याची कार्यवाही प्रगती पथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आर्णी (जि.यवतमाळ) नगरपालिकेच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीचे आर्थिक लाभ देण्याबाबत

**(२०) * २५०९७ श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्णी (जि.यवतमाळ) नगरपालिकेच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतरचे आर्थिक लाभ (सेवानिवृत्तीनंतर लवकर) देण्याची मागणी मा.जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचेकडे आर्णी सेवानिवृत्त कर्मचारी यांनी दिनांक १३ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) राज्यातील नगरपरिषदांमधील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतरचे आर्थिक लाभ दि.३१/०३/२०१७ पर्यंत अदा करण्याच्या दृष्टीने आयुक्त तथा संचालक नगरपालिका प्रशासन संचालनालय वरळी मुंबई यांनी दि.०९/०९/२०१६ रोजीच्या परिपत्रकान्वये सर्व जिल्हाधिकारी व सर्व मुख्याधिकारी यांना सुचना दिल्या आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विमानतळ परिसरातील झोपडपट्टीवासियांच्या पुनर्वसनाबाबत**

**(२१) * २४१२७ ॲड.अनिल परब, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त : तारांकित प्रश्न क्रमांक १४६८५ ला दिनांक २३ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या विविध भागातील विमानतळांचा विकास व्हावा या दृष्टीने राज्य शासनाने भारतीय विमानतळ विकास प्राधिकरण व केंद्रीय विमान वाहतूक मंत्रालयाशी करार केला आहे, हे खरे आहे काय.
(२) असल्यास, सदर कराराच्या अनुषंगाने विविध विमानतळाच्या आजुबाजुच्या झोपडपट्टयांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे काय, तसेच विमानतळाच्या परिसरातील झोपडपट्टयांच्या पुनर्वसनाबाबत शासनाची भूमिका काय आहे,
(३) असल्यास, विमानतळ परिसरातील झोपडपट्टीवासियांचे त्याच जागी पुनर्वसन व्हावे याकरिता राजकीय पक्षाच्यावतीने जीव्हीकेच्या विरोधात मोर्चा काढण्याचा इशारा शासनास देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, झोपडपट्टीवासियांचे त्याच परिसरात पुनर्वसन व्हावे याकरिता शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) ते (५) हया करारानुसार राज्याच्या गोंदिया, अमरावती, नांदेड, जळगांव, नाशिक, शिर्डी, सोलापूर, कोल्हापूर, रत्नागिरी व सिंधुदुर्ग हया विमानतळांचा समावेश करण्यात आला असून या ठिकाणी झोपडपट्टया नसल्यामुळे सर्वेक्षण करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कल्याण-डोंबिवली महापालिकेने केलेल्या धरणाच्या मागणीबाबत**

**(२२) * २३५३७ श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्रात वाढते नागरीकरण व पाण्याची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी सदरील महापालिकेला स्वत:च्या मालकीचे धरण असण्याची गरज असल्याने त्याबाबतची मागणी शासनाकडे केली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कल्याण-डोंबिवली महापालिकेने केलेल्या मागणीबाबत शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अशा आशयाचे मागणी वजा निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात बालमजुरांचे प्रमाण वाढत असल्याबाबत**

**(२३) * २४४५६ श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात घरकाम, हॉटेल, गॅरेज, जरी, चामड्याचा व्यवसाय, लघुउद्योग व अन्य कामाच्या ठिकाणी बालमजुरांचे काम करण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने राज्यात बालमजुरांचे सर्वेक्षण केले आहे काय,

(३) असल्यास, राज्यात बालमजुरांची किती संख्या आहे तसेच बालमजुरांबाबत शासनाने काही नविन धोरण तयार केले आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) हे खरे नाही.

कामगार आयुक्त कार्यालयातर्फे बाल कामगारांना मुक्त करण्याचा धाडसत्र सतत चालू राहतात.

२०१४ मध्ये ८७ धाडसत्रात ६०९ बाल कामगार, २०१५ मध्ये ६३ धाडसत्रात १९६ बाल कामगार व २०१६ मध्ये ३९ धाडसत्रात ५१ बाल कामगारांना मुक्त करण्यात आले आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**भिवंडी (जि.ठाणे) येथील दंगलीबाबत**

**(२४) * २५८९१ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिंवडी (जि.ठाणे) येथील शांतीनगर वसाहतीच्या परिसरातील गायत्री चौकात दिनांक १२ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास दोन गटात झालेल्या वादानंतर उसळलेल्या दंगलीत सहा पोलीस गंभीर जखमी झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरात अनुसूचित प्रकार घडू नयेत यासाठी पोलिसांनी शहराच्या वेगवेगळया भागात कोम्बिंग ऑपरेशन करुन दोनशेहून अधिक समाजकंटकांना ताब्यात घेतले, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्याचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुंषगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) घटनेनंतर पोलीसांनी विविध भागात कोम्बिंग ऑपरेशन करुन संशयितांना ताब्यात घेतले होते. संशयित इसमांपैकी ज्यांचा सहभाग निश्चित झाल्याचे आढळून आले त्यांना अटक करण्यात आली व सहभाग नसणाऱ्यांना सोडून देण्यात आले.

(३) उपरोक्त घडलेल्या घटनेच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे ५ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

१. गु.र.क्र.२९९/२०१६ भा.दं.वि.कलम २९५, १४३, १४६, १४७, १४९ सह क्रिमिनल अमेन्डमेन्ट ॲक्ट ३ व ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयात २४ आरोपींना अटक करण्यात आली.

२. गु.र.क्र.२९९/२०१६ भा.दं.वि.कलम २९५, ३३२, ३३६, ३५३, १४३, १४६, १४७, २९५ सह क्रिमिनल अमेन्डमेन्ट ॲक्ट ३ व ७ प्रमाणे गन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्ह्यात १५ आरोपींना अटक करण्यात आली.
३. गु.र.क्र.३०१/२०१६ भा.दं.वि. कलम ३३६, १४३, १४६, १४७, १४९, २९४ सह क्रिमिनल अमेन्डमेन्ट ॲक्ट ३ व ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्ह्यात ११ आरोपींना अटक करण्यात आली.
४. गु.र.क्र.३०२/२०१६ भा.दं.वि.कलम ३०७, ३५३, ३३२, ३३६, ३३८, १४३ ते १४९, ४२७ सह सार्वजनिक संपत्तीस हानी प्रतिबंधक कायदा १९८४ चे कलम ३ व ४, सह क्रिमिनल अमेन्डमेन्ट ॲक्ट ३ व ७ सह मु.पो.का.कलम ३७ (१), (३) १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात १९ आरोपींना अटक करण्यात आली.
५. गु.र.क्र.१६१/२०१६ भा.दं.वि.कलम १८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्ह्यात ०३ आरोपींना अटक करण्यात आली.

सर्व अटक आरोपी सध्या न्यायालयीन कोठडीत असून सदर प्रकरणाचा तपास चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्ह्यातील बेपत्ता अल्पवयीन मुलांच्या शोधाबाबत

**(२५) * २५३२६ श्री.आनंद ठाकूर, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील वसई, नालासोपारा, तुळींज, विरार, माणिकपूर आणि अर्नाळा या परिसरातून माहे जानेवारी, २०१५ ते ऑगस्ट, २०१६ या वीस महिन्यांच्या कालावधीत ५६० अल्पवयीन मुले बेपत्ता झाल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आतापर्यंत किती बेपत्ता मुलांचा शोध लागलेला आहे, तसेच मुले बेपत्ता होण्याच्या घटनांना तात्काळ आळा घालण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) जानेवारी, २०१५ ते ऑगस्ट, २०१६ या कालावधीत पालघर जिल्हयातून एकूण ५९३ मुले बेपत्ता झालेली होती. यापैकी ५३७ मुलांचा शोध लागलेला आहे.

या घटनांना आळा बसण्यासाठी गृहनिर्माण सोसायटीमध्ये भेटी देऊन जनजागृती केली जाते. तसेच जिल्हयात अनैतिक मानवी प्रतिबंधक कक्ष स्थापित असून मुस्कान अभियान राबवून बेपत्ता व्यक्तिंचा शोध घेण्यात येतो. मा. सर्वोच्च न्यायालयाने रिट पिटीशन (सिव्हील) क्र. ७५/२०१२ मध्ये दिलेल्या सुधारीत कार्यप्रणाली व पोलीस महासंचालक, मुंबई यांचेकडील स्थायी आदेशान्वये मार्गदर्शन व सुचनाप्रमाणे मुलांचा शोध घेण्यात येतो.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील इसिस या दहशतवादी संघटनेचा**
**वाढता प्रभावास प्रतिबंध घालण्याबाबत**

**(२६) * २३६२९ श्री.नारायण राणे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.सुभाष झांबड, श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मराठवाडा व विदर्भ विभागात इसिस या दहशतवादी संघटनेचे स्लीपर सेल सक्रीय झाले असून येथील बेपत्ता १०० तरुणांपैकी काही तरूण इसिसमध्ये सहभागी झाले असल्याचे माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात घातपात घडविण्यासाठी स्फोटकांची जुळवाजुळव करणाऱ्या इसिसच्या एका एजंटला दहशतवाद विरोधी पथकाने परभणी येथे अटक करण्यात आली असल्याचे माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील इसिस या दहशतवादी संघटनेचा वाढता प्रभावास प्रतिबंध घालण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) दहशतवाद विरोधी पथक व राज्य गुप्तवार्ता विभाग यांचेकडे अधिकृत निश्चित स्वरुपाची माहिती नाही.

(२) हे खरे आहे.

(३) इसिस या दहशतवादी संघटनेत राज्यातील तरुण दाखल होऊ नयेत म्हणून खालील उपाययोजना करण्यात येत आहेत.

(अ) दहशतवाद विरोधी पथकाच्या विविध पथकांनी शाळा व महाविद्यालयांना भेटी देऊन विद्यार्थ्यांना दहशतवाद या विषयाबाबत जागृत करुन दहशतवादाबाबत पोलिसांना मदत करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

(ब) युवकांना दहशतवादी संघटनेमध्ये सामील होण्यापासून परावृत्त करण्यात आले असून त्यांचे समुपदेशन करण्यात आले आहे.

(क) राज्यातील अल्पसंख्यांक समाजातील धर्मगुरु, मौलवी व विद्वान लोकांशी बैठक घेऊन इसिस या दहशतवादी संघटनेविरोधी अल्पसंख्यांक समाजामध्ये प्रबोधन करण्याची विनंती करण्यात आली आहे.

(ड) धार्मिक अस्थिरता निर्माण करणाऱ्या वेबसाईट, सोशल नेटवर्कींग साईटवर लक्ष ठेवले जात असून, अशा वेबसाईट सर्व्हिस प्रोव्हाईडर कंपनीशी संपर्क साधण्यात येत असून धार्मिक असलोख निर्माण करणाऱ्या इसमांविरुध्द कायदेशीर कार्यवाही करणे तसेच दहशतवादी संघटनांमध्ये ऑनलाईन भरती करीत असल्याचा संशय येत असलेल्या साईटवर लक्ष ठेवण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर महापालिकेची रक्कम भरण्यास विलंब करणाऱ्या कंत्राटदाराविरुध्द कारवाई करण्याबाबत

**(२७) * २५३५० ॲड.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरातील रंकाळा तलावात देवराज बोटिंग यांना दिनांक १८ मार्च, २०१५ रोजी पासून पाच वर्षासाठी बोटींगचे कंत्राट देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंत्राटदाराने महापालिका प्रशासनाला रुपये १८ लाख ७८ हजार ७०० द्यावयाचे असताना पहिल्या वर्षात रुपये १६ लाख ३५ हजार एवढीच रक्कम भरलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कंत्राटदाराची मुदत दिनांक १८ मार्च, २०१६ रोजी संपली असताना महापालिकेकडे पुढील हप्त्याची रक्कम जमा केलेली नाही, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुसार महापालिकेची रक्कम भरण्यास विलंब करणाऱ्या कंत्राटदाराविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे,
(२) कंत्राटदाराने महानगरपालिकेला १८ लाख, ७८ हजार ७०० रुपये भरावयाचे नसून करारा नुसार कंत्राटदाराने पहिल्या वर्षाची १६ लाख, ३५ हजार, ७४० रुपये इतकी रक्कम महानगरपालिकेकडे भरणा केलेली आहे.
(३) सदर कराराची मुदत १३ मार्च, २०२० पर्यंत असून दुसऱ्या वर्षाची रक्कम कंत्राटदाराने अद्याप भरणा केली नसल्याने महानगरपालिकेने कंत्राटदारास दिनांक ०४ ऑगस्ट, २०१६ रोजी नोटीस बजावण्यात आली असून दिनांक २५ नोव्हेंबर, २०१६ रोजीच्या नोटीसद्वारे कंत्राटदारास सात दिवसाच्या आत व्याजासह रक्कम भरण्याचे व रक्कम न भरल्यास कंत्राट रद्द करणार असल्याचे कळविले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### वाई (जि.सातारा) येथील डॉक्टरने सहा महिलांचे खून केल्याप्रकरणी सुरु असलेल्या चौकशीबाबत

**(२८) * २५४९५ श्री.रामराव वडकुते, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाई (जि.सातारा) येथील डॉ.संतोष पोळ या डॉक्टरने सहा महिलांचे खून केल्या प्रकरणी सुरु असलेली चौकशी पूर्ण झाली काय,
(२) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नूसार सदर खूनी डॉक्टरवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) डॉ. संतोष पोळ यांच्या विरुध्द वाई जि.सातारा पोलीस ठाणेत ५ महिला व एक पुरुष अशा एकूण ६ व्यक्तींचे खून केल्या प्रकरणी एकूण ६ गुन्हे खालील प्रमाणे दाखल करण्यात आलेले आहे.

१) गु.र.नं. १५८/२०१६ भा.दं.वि. कलम ३६५, ३६४, ३०२, २०१, १२०(ब), ३९७, ४०४, ३४

२) गु.र.नं. १७५/२०१६ भा.दं.वि. कलम ३०२, २०१, १२०(ब), ३९७, ४०४, ३४

३) गु.र.नं. १७६/२०१६ भा.दं.वि. कलम ३०२, २०१, १२०(ब), ३९७, ४०४, ३४

४) गु.र.नं. १७७/२०१६ भा.दं.वि. कलम ३०२, २०१

५) गु.र.नं. १७८/२०१६ भा.दं.वि. कलम ३०२, २०१, ४०४

६) गु.र.नं. १७९/२०१६ भा.दं.वि. कलम ३०२, २०१, ४०४

सदर गुन्ह्यांपैकी गु.र.नं. १५८/२०१६, १७५/२०१६ व १७६/२०१६ या गुन्ह्यात आरोपी संतोष गुलाबराव पोळ व त्याची साथीदार ज्योती पांडुरंग मांढरे यांचे विरुध्द मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वाई यांचे न्यायालयात दोषारोपपत्र पाठविले आहे. उर्वरीत ३ गुन्ह्यांचा तपास सुरु आहे. यातील आरोपी न्यायालयीन कोठडीमध्ये आहे.

(३) विलंब झालेला नाही

-----------------

## चंद्रभागा नदी प्रदुषण मुक्त करण्याबाबत

**(२९) * २५५८४ श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वारकऱ्यांचे श्रध्दास्थान असलेली चंद्रभागा नदी सन २०२२ पर्यंत निर्मळ आणि प्रदुषणमुक्त करण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली नमामि चंद्रभागा प्राधिकरण स्थापन करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्राधिकरणाने संपूर्ण चंद्रभागा नदी परिसर व वारीमार्ग स्वच्छ करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) दिनांक १२ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार मा.मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली नमामि चंद्रभागा प्राधिकरण स्थापन करण्यात आले आहे.

(३) या अनुषंगाने विस्तृत आराखडे तयार करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर विविध सेवा सुविधा पुरविणारी कंपनी बंद झाल्याने कामगारांची देणी प्रलंबित असल्याबाबत

**(३०) * २३५४६ श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक १४८५२ ला दिनांक ६ एप्रिल, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर विविध सेवा सुविधा पुरविणाऱ्या कंबाटा एव्हिएशन प्रा.लि.कंपनी माहे ऑगस्ट, २०१६ ला बंद करण्यात आली परंतु ३००० कामगारांना त्यांची हक्काची देणी मिळाली नसून त्यासंदर्भात विधीमंडळाच्या सन २०१६ च्या पावसाळी अधिवेशनामध्ये लक्षवेधी सूचना देण्यात आली होती. त्या लक्षवेधी संदर्भात कामगारांची देणी मिळण्याबाबत निर्णय घेण्याकरीता संबंधितांच्या मा.कामगार मंत्री महोदयांसोबत मा.सभापतीच्या दालनात दोन बैठका घेण्यात आल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बैठकांमध्ये मुंबई विमानतळावरील जी.व्ही.के.कंपनी ही कंबाटा कंपनीच्या कामगारांची बाब गांभिर्याने घेत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कामगारांना त्यांची हक्काची देणी देण्याच्या दृष्टीने जी.व्ही.के.कंपनीवर काय कारवाई केली वा करण्यात येत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) मे.कंबाटा एव्हीएशन लि.बंद करण्यात आली आहे, हे खरे आहे.

सदर प्रकरणी मा.मंत्री (कामगार) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २७/०७/२०१६ रोजी बैठक घेण्यात आली. दिनांक ३१/०८/२०१६ व दिनांक २९/०९/२०१६ रोजी मा.सभापती, विधानपरिषद महोदयांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली व दिनांक ०९/११/२०१६ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली, हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

जी.व्ही.के व कंबाटा एव्हिएशन या दोन्ही आस्थापनेकरिता केंद्र शासन समुचित शासन आहे. प्राप्त माहितीनुसार दोन्ही आस्थापना स्वतंत्र आहेत. जी.व्ही.के. यांचे नोंदणी प्रमाणपत्रानुसार मे.कंबाटा ही आस्थापना कंत्राटदार म्हणून नोंदित नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नाशिक येथील गोदावरी नदीपात्र प्रदूषण मुक्त करणेबाबत**

**(३१) * २३६१९ डॉ.अपूर्व हिरे, श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंहस्थ कुंभमेळ्याच्या समापनानंतर आवश्यक उपाय व खबरदारी अभावी गोदावरी नदीचे पात्र पुन:श्च खुपच अस्वच्छ, प्रदुषित झाले असून केरकचरा, पानवेलीमुळे दुर्गंधी पसरत असल्याचे तसेच नदीपात्रात संत गाडगे महाराज धर्मशाळा व टाळकुटेश्वर मंदिराजवळील आणि अन्य ठिकाणचे ड्रेनेजचे पाणीही थेट नदीपात्रात मिसळत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नदी स्वच्छतेसाठी कायमस्वरुपी कृती आराखडा तयार करून त्याची अंमलबजावणी करण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून होत असून नदीचे पावित्र्य व सौंदर्य कायमस्वरुपी अबाधित रहावे आणि नदीपात्रातील पाणी प्रदुषित होऊ नये म्हणून कायमस्वरुपी उपाययोजना करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, नाशिक महानगरपालिकेच्या महसुलात वाढ होण्यासाठी व पर्यटनाच्या दृष्टीने नाशिक शहरातील गोदावरी नदीवरील घाट, मैदाने आणि साधुग्रामसह इतर सर्व मोकळे भूखंड जतन करून त्यांची नियमित देखभाल करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान शासनास निवेदन दिलेले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) गोदावरी नदीपात्रात नैसर्गिक पर्यावरणपुरक प्रवाह नसल्याने तसेच, नाशिक महानगरपालिका क्षेत्रात दि.२ व ३ ऑगस्ट, २०१६ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे मलवाहिन्यांची वहनक्षमता मोठया प्रमाणात बाधीत झाल्याने, काही प्रमाणात प्रदुषण झाल्याचे आढळून आले होते, ही वस्तुस्थिती आहे.

(२) गोदावरी नदी स्वच्छतेबाबत कायम स्वरुपी उपाययोजना करावी, अशी स्थानिक नागरीकांकडून मागणी करण्यात येते, हे खरे आहे.

गोदावरी नदीचे पात्र प्रदुषित होऊ नये, तसेच, तेथे स्वच्छता राखली जावी म्हणून महानगरपालिकेमार्फत खालील उपाययोजना करण्यात येत आहेत :-

- नाशिक शहरासाठी सन २०४१ पर्यंतचा मलनि:सारण व्यवस्थापन आराखडा नाशिक महानगरपालिकेने तयार केला असून त्याची टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.
- याअंतर्गत अमृत योजनेतून गंगापूर येथे १८ द.ल.लि. प्रतिदिन क्षमतेच्या मलशुध्दीकरण केंद्राच्या कामास प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाली असून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

याशिवाय नदीपात्राची स्वच्छता राखण्यासाठी खालील उपाययोजना करण्यात येत आहेत :-

- सद्यस्थितीत मनपाची वाहने व मनुष्यबळ वापरुन गोदावरी स्वच्छतेचे काम सुरु आहे. तथापि, गोदावरी नदीमधील वाढणाऱ्या पानवेली काढण्यासाठी निविदा काढून एजन्सीमार्फत कामे करण्याचे प्रस्तावित आहे.
- दिनांक ०२ व ०३ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या अतिवृष्टीमुळे आलेल्या महापुरात बाधीत झालेल्या मलवाहिका व चेंबरची दुरुस्ती नाशिक महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.
- धार्मिक महत्वाचे रामघाट परिसर व नदीवरील पुलांवर निर्माल्य संकलनासाठी निर्माल्य कुंड ठेवण्यात आले आहेत.

- रामकुंड तथा रामघाटाची दैनंदिन स्वच्छता महानगरपालिकेमार्फत राखण्यात येत आहे.
- रामकुंडाजवळ पिंडदान तथा पुजा साहित्य इ. वस्तु संकलित करण्यासाठी कृत्रिम पात्र ठेवण्यात आले आहेत.
- प्रायोगिक तत्वावर दोन पुलांच्या बाजुने गोदावरी पात्रात निर्माल्य टाकण्यास अटकाव निर्माण करण्यासाठी नेट बसविण्यात आली.

(३) व (४) अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाले आहे.

महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवरील साधुग्राम व इतर मोकळे भूखंड यांची नियमित देखभाल करण्यात येते.

सिंहस्थ कालावधीत बांधण्यात आलेले घाट व त्यालगतची जागा देखभालीसाठी महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्याबाबत जिल्हाधिकारी, नाशिक यांना विनंती करण्यात आली आहे.

घाट व त्यालगतची जागा, तसेच महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवरील साधुग्राम व इतर मोकळे भूखंड यांचा वापर चौपाटी, विविध प्रदर्शने, सार्वजनिक सभा, क्रिडा स्पर्धा, खुले वाहनतळ व तत्सम प्रयोजनासाठी करुन त्याव्दारे महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील अंशकालीन**
**निदेशकांचे थकीत वेतन अदा करण्याबाबत**

**(३२) * २६०४४ श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.दत्तात्रय सावंत :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील अंशकालीन निदेशकांना मागील काही महिन्यापासून वेतन अदा झाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कौशल्य विकास शिक्षणाला केंद्र व राज्य शासनाने अनन्य साधारण महत्व दिले असताना निदेशकांचे वेतन थकविल्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, निदेशकांचे वेतन अदा करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पंढरपूर नगरपालिका हद्दीतील गटारे बंदिस्त करणेबाबत**

**(३३) * २६०२४ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर नगरपालिका हद्दीतील इसबावी गट नं ११७ व ११८ येथे जलनि:सारण (गटारे) बांधण्याबाबत निविदा मंजूर केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगरपालिकेने निविदा मंजूर करूनही काम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर भागातील मैलामिश्रित पाणी उघड्यावर सोडले जात असल्यामुळे हा परिसर दुर्गंधीयुक्त झाला आहे त्यामुळे स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधी यांनी मुख्याधिकारी, पंढरपूर, नगरपरिषद यांचेकडे अर्ज/विनंत्या केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) भुयारी गटार योजनेतील काम अपूर्ण असलेल्या भागातील सांडपाणी खड्डयामध्ये एकत्रित करुन नगरपरिषदेमार्फत सक्शन करुन उचलण्यात येते.

(४) सदर योजनेच्या अपूर्ण कामाविषयी स्थानिक जमिनधारकांशी नगरपरिषद प्रशासनाने चर्चा केली असुन काम सुरू करण्यात आले आहे. सदर काम डिसेंबर,२०१६ अखेरपर्यत पूर्ण करण्याचे नगरपरिषदेचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मालवण (जि.सिंधुदूर्ग) येथील माजी सैनिकांच्या मुलांच्या वसतिगृहाचे रुपांतर विश्रामगृहात करण्याचा घेतलेला निर्णय

**(३४) * २४९४० श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण (जि.सिंधुदूर्ग) येथील माजी सैनिकांच्या मुलांच्या वसतिगृहातील मुलांना बाहेर काढून वसतिगृहाचे रुपांतर सैनिक कल्याण विभाग विश्रामगृहात करणार असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांनी तसेच वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी तीव्र विरोध करुन जिल्हा सैनिक कल्याण विभाग (जि.सिंधुदूर्ग) यांना माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

मालवण (जि.सिंधुदुर्ग) येथील वसतिगृह हे माजी/शहीद सैनिकाच्या मुलांसाठी चालविण्यात येते. येथील वसतिगृहात बऱ्याच वर्षापासून माजी सैनिकांची केवळ १ किंवा २ मुले प्रवेश घेतात. त्यामुळे वसतिगृह चालविणे परवडत नाही. त्यामुळे दिनांक २४ जून, २०१३ रोजी झालेल्या विशेष निधी (महाराष्ट्र) राज्य व्यवस्थापकीय समितीच्या कार्यकारी समितीच्या ९ व्या बैठकीत सदर वसतिगृहाचे रुपांतर सैनिक विश्रागृहात करण्यास मान्यता देण्यात आली.

(२) याबाबतचे निवेदन प्राप्त झालेले नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पी.सी.टेक्नॉलॉजी या सॉफ्टवेअर कंपनीने नोकरीचे**
**आमिष दाखवून तरुणांची केलेली फसवणूक**

**(३५) * २३५२८ श्री.जयंत पाटील, श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.रामराव वडकुते, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, ठाणे आणि नवी मुंबईमध्ये ८०० इंजिनिअरना नोकरीचे आमिष दाखवून २५ हजार रूपयांची अनामत रक्कम घेवून पी.सी.टेक्नोलॉजी या सॉफ्टवेअर कंपनीने कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार दिनांक १९ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीमार्फत प्रशिक्षणाच्या कालावधीत प्रशिक्षणार्थी उमेदवारास रूपये ६ ते ७ हजार इतके मानधन देण्यात येणार होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कंपनीच्या वागळे इस्टेट येथील अशर आयटी पार्कमधील जागेचे भाडे व दुरूस्तीची रक्कम थकविल्यामुळे कंपनीला सील लावण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून चौकशीच्या अनुषंगाने याप्रकरणातील किती दोषींना अटक करण्यात आली आहे व त्यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

सदरहू प्रकरणी नोकरी लावण्याचे आमिष दाखविल्याप्रकरणी उमेदवारांकडून Refundable Deposit म्हणून प्रत्येकी रु.२५ हजार एवढी रक्कम परत न देता ऑफिस बंद करुन सुमारे दिड कोटी रुपयांचा अपहार करुन फसवणूक केल्याप्रकरणी ठाणे पोलीस आयुक्तालयातील वागळे इस्टेट परिसरातील पी.सी. टेक्नॉलॉजी प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या तीन संचालकांविरुध्द गु.रजि.क्र. २२९/२०१६ भा.दं.वि. कलम ४०६, ४२०, १२०(ब) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

(२) होय

(३) सदर कंपनीने इलेक्ट्रिसिटी बिलाचा भरणा न केल्यामुळे कंपनीला सील ठोकण्यात आले आहे.

(४) वरील गुन्हयातील आरोपी अद्यापी फरार आहेत. त्यांचा शोध घेण्यात येत असून त्यांना एल.ओ.सी.वर ठेवण्यात आले आहे. प्रकरण तपासाधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत सन १९९५ पासूनच्या पात्र लाभधारकांना त्यांच्या सदनिकांच्या देखभाल दुरुस्ती शुल्कात वाढ करण्याबाबत

**(३६) * २३६४८ ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक १४९८४ ला दिनांक २३ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: मुंबई व ठाणे शहरात महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळामार्फत झोपडपट्टी पुनर्वसन योजना (SRA) राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, सदर योजनेंतर्गत सन १९९५ पासूनच्या पात्र लाभधारकांना त्यांचे घराचे देखभालीसाठी (Maintains) रक्कम रुपये वीस हजार ऐवजी रुपये ४० हजार करण्याचा निर्णय शासनाने सन २०१६ च्या प्रथम अधिवेशनात घेतला आहे, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, गेल्या २० वर्षात वाढलेली महागाई, तसेच पाणीपट्टी कर, वीज कर व मालमत्ता कर इत्यादी मध्ये वेळोवेळी झालेली वाढ तसेच १५ ते २० वा त्यापेक्षाही अधिक मजल्यांचे इमारती बांधकामास देण्यात येणारी परवानगी, यामुळे पात्र लाभधारकांना देण्यात येणाऱ्या रुपये चाळीस हजार रक्कमेत तातडीने वाढ करुन त्याऐवजी ही रक्कम रुपये ७० हजार इतकी करण्यात यावी, अशी मागणी संबंधित सर्व पात्रधारकांकडून सन २००० पासून ते आजतागायत मुख्याधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मा.प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय व मा.गृहनिर्माण मंत्री यांचेकडे निवेदनाद्वारे वारंवार करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय
(४) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासन स्तरावर अद्याप कार्यवाही केली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय
(५) असल्यास, त्याप्रकरणी शासनाने रक्कम वाढविण्याची कार्यवाही न करण्याची कारणे काय व त्याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) बृहन्मुंबई तसेच ठाणे महानगरपालिका क्षेत्रात झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई या कार्यालयामार्फत झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यात येत आहेत.

(२) नगरविकास विभागाच्या दिनांक २१ एप्रिल, २०१६ रोजीच्या अधिसूचनेन्वये बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली १९९१ विनियम ३३(१०) परिशिष्ट-४ च्या खंड ९.१ मधील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील पुनर्वसन घटकातील प्रत्येक सदनिकेच्या अनुषंगाने देखभाल खर्चाची रक्कम रुपये २०,०००/- ऐवजी रुपये ४०,०००/- इतकी करण्यात आली आहे.

(३) व (४) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये सदनिकांच्या देखभाल व दुरुस्ती शुल्कामध्ये वाढ करण्याबाबत निवेदने संबंधितांकडून प्राप्त झालेली आहेत. तथापि वर नमूद केल्याप्रमाणे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या प्रस्तावानुसार दिनांक २१ एप्रिल, २०१६ रोजी देखभाल शुल्क वाढविण्याबाबत अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई शहर आणि उपनगरातील म्हाडाच्या संक्रमण शिबिरांची झालेली दुरवस्था

**(३७) * २४७६९ श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर आणि उपनगरामध्ये असलेल्या म्हाडाच्या जीर्ण संक्रमण शिबिरात ५० वर्षांपेक्षा अधिक काळ भाडेकरु बिकट अवस्थेत राहत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही बैठी व जीर्ण अवस्थेतील संक्रमण शिबिरे पाडून त्या जागी चार वाढीव क्षेत्रफळाचा वापर करुन येथे इमारती उभ्या करुन येथील रहिवाशांना घरे देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) व (२) मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या संक्रमण शिबीरातील संक्रमण गाळे बहुतांशी बैठ्या चाळी, तळ + १ मजला या स्वरुपातील आहेत. यातील बरीचशी संक्रमण शिबीरे जुनी व जीर्ण झाली आहेत. सदर संक्रमण शिबीरांचा आवश्यकतेनुसार प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार अनुज्ञेय चटई क्षेत्राचा वापर करुन सध्या पुनर्विकास करण्यात येत आहे.

त्याशिवाय शासनाने मागील अधिवेशनात दिलेल्या आश्वासनानुसार विविध विषयांवर शासनास शिफारशी करण्यासाठी दिनांक २९ ऑक्टोबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये विधानमंडळ सदस्यांची समिती गठित केली असून यामध्ये म्हाडाच्या संक्रमण शिबीरांची पुनर्बांधणी करणेबाबतची बाबदेखील अंतर्भूत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील नद्यांची पूरनियंत्रण रेषा निश्चित करण्याबाबत**

**(३८) * २४९०५ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त : तारांकित प्रश्न क्रमांक १४६७६ ला दिनांक १३ एप्रिल, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील नद्यांची पूरनियंत्रण रेषा महापालिकेला निश्चित करता न आल्याने आगामी विकास नियोजन आराखडयात त्याचा समावेश करण्यात आला नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईचा सन २०१४-३४ चा विकास आराखडा तयार करताना मुंबईच्या नदी किनाऱ्यालगतची पूरनियंत्रण रेषा निश्चित करून त्यात तिचा अंतर्भाव करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१) सर्वसाधारणपणे मुंबई बाहेरील नद्यांचे प्रवाह हे नैसर्गिक असून त्यांना संरक्षक भिंती बांधून त्यांच्या पात्रांचे सीमांकन केले जात नाही. त्यामुळे पावसाळ्यात अतिवृष्टीच्या वेळी नदीचे पाणी पात्रांबाहेर आसपासच्या परिसरामध्ये पसरुन पूर परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता असल्याने, पूर नियंत्रण रेषा निश्चित केली जाते.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये नद्या व नाले यांचे रुंदीकरण व खोलीकरण सल्लागारानी अभ्यास करुन केलेल्या शिफारसीनुसार पात्रांच्या दोन्ही बाजूला उच्चतम भरतीच्या पातळीपर्यंत आर.सी.सी.संरक्षक भिंत बांधून केले जाते. यास्तव, पूरनियंत्रण रेषा निश्चित केली जात नाही. तसेच पर्जन्य जलवाहिन्यांच्या प्रारुप आराखड्यामध्ये अतिवृष्टीमुळे पाणी साचण्याची जी ठिकाणे निश्चित केली आहेत व त्यांचा प्रभाव कमी करण्यासाठी उपाययोजना सुचविलेल्या आहेत त्यांची अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने करणेत येत आहे.

त्यामुळे विशिष्ट अशी पूरनियंत्रण रेषा महानगरपालिकेकडून दिनांक २७/५/२०१६ रोजी प्रसिध्द केलेल्या सुधारीत प्रारुप विकास आराखड्यामध्ये दर्शविणेत आलेली नाही.

(२) व (३) प्रश्नामधील भाग क्र.१ मध्ये नमूद केलेली वस्तूस्थिती विचारात घेता प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नळदुर्ग (ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद) नगरपालिकेतील घरकुल योजनेत झालेला गैरव्यवहार

**(३९) * २५८९५ श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नळदुर्ग (ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद) नगरपालिकेतील घरकुल (आयएचएसडीपी) योजनेत झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी पुर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, सदर चौकशीत दोषी आढळून आलेल्या अधिकारी, पदाधिकारी व ठेकेदार यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) होय.

(२) नगरपरिषद सदस्यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी, उस्मानाबाद यांच्यामार्फत सविस्तर चौकशी करण्यात आलेली असून चौकशीमध्ये तत्कालिन नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष व तत्कालीन मुख्याधिकारी दोषी आढळून आल्याने अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्यावर कारवाई करणेबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांनी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचेकडे सादर केला आहे.

त्याचप्रमाणे मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे याप्रकरणी PIL NO ७०/२०१४ दाखल असून, सध्या प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील शासकीय कर्मचारी संघटनेच्यावतीने कामकाजाचा पाच दिवसांचा आठवडा करण्याची होत असलेली मागणी**

**(४०) * २५६८४ श्री.कपिल पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे : तारांकित प्रश्न क्रमांक १९९०९ ला दिनांक २७ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:**
सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासन, स्थानिक स्वराज्य संस्था आणि शाळा, महाविद्यालय या सर्वांसाठी पाच दिवसांचा आठवडा करण्याची मागणी राज्य शासकीय कर्मचारी संघटना, राजपत्रित अधिकारी संघटना व शिक्षक भारती यांनी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीज, पाणी, श्रम आणि महानगरांमधील वाहतूक कोंडी वाचवून कामाचा दर्जा वाढवण्यासाठी व गतीमान करण्यासाठी पाच दिवसांचा आठवडा करण्यात यावा आणि कामाच्या वेळा भिन्न ठेवाव्यात अशा स्वरुपाच्या मागण्यांवर शासनाची काय भूमिका आहे,

(३) असल्यास, त्यावर शासनाने निर्णय घेतला आहे वा घेणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) व (३) राज्य शासनाच्या कर्मचाऱ्यांसाठी केंद्र शासनाच्या धर्तीवर पाच दिवसांचा आठवडा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बृहन्मुंबई महानगरपालिकेत रस्ते दुरुस्तीच्या गैरव्यवहाराप्रकरणी सुरु करण्यात आलेल्या चौकशीबाबत**

**(४१) * २४५३६ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप : तारांकित प्रश्न क्रमांक १९८२२ ला दिनांक २० जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :**
सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेत रस्ते दुरुस्तीच्या कामांमध्ये सुमारे ३५० कोटी रुपयांच्या झालेल्या गैरव्यवहाराप्रकरणी सुरु करण्यात आलेल्या चौकशीचा अहवाल प्राप्त झाला आहे काय,

(२) असल्यास, उक्त रस्ते दुरुस्तीच्या गैरव्यवहारात दोषी ठरलेल्या सहा कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकल्यानंतरही ते त्यांच्या भागीदारीतील दुसऱ्या कंपनीच्या नावावर कोट्यवधी रुपयांची कामे करण्यास महापालिकेत प्रवेश करु शकत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यामुळे कंपन्यांऐवजी व्यक्तीवर बंदी आणण्याबाबत तसेच रस्ते दुरुस्ती गैरव्यवहार प्रकरणाच्या चौकशी अहवालाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेत रस्ते दुरुस्तीच्या कामांमध्ये सुमारे ३५० कोटी रुपयांच्या झालेल्या गैरव्यवहारप्रकरणी सुरु करण्यात आलेल्या चौकशीचा अंतरिम अहवाल महानगरपालिकेस प्राप्त झाला आहे.
(२) रस्ते दुरुस्तीच्या गैरव्यवहारात दोषी आढळलेल्या ६ कंत्राटदारांना काळया यादीत टाकण्यासाठी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. ही कार्यवाही सुरु करण्यात आल्यानंतर सदर कंत्राटदार व त्यांचे भागीदार असलेले कंत्राटदार यांना महानगरपालिकेमार्फत कोणत्याही नवीन कामाचे कंत्राट देण्यात आलेले नाही.

तसेच, महानगरपालिकेत अस्तित्वात असलेल्या कंत्राटदर नोंदणी नियमावलीनुसार सदर कंत्राटदारांना कामे देता येणार नाहीत.
(३) रस्ते दुरुस्तीच्या गैरव्यवहारात दोषी आढळलेल्या ६ कंत्राटदार व २ त्रयस्थ लेखापरिक्षक यांच्यावर महानगरपालिकेमार्फत आझाद मैदान पोलीस स्टेशन येथे दिनांक २७.०४.२०१६ रोजी क्रमांक १६६/१६ अन्वये प्रथम खबर अहवाल (F.I.R.) दाखल करण्यात आलेला आहे.

सदर कंत्राटदार व त्रयस्थ लेखापरीक्षक यांना काळया यादीत टाकण्याच्या प्रक्रियेअंतर्गत कारणे दाखवा नोटीसा बजावण्यात आल्या असून याबाबतची पुढील कार्यवाही महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बीड येथे सामूहिक बलात्कार प्रकरणातील पिडीतेला नुकसान भरपाईची रक्कम देणेबाबत

**(४२) * २४६७७ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड येथे सन २०१० साली झालेल्या सामूहिक बलात्कार प्रकरणात दिनांक २२ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास दिलेल्या निकालामध्ये पिडीतेला शासनाने केंद्रीय अधिनियमान्वये बळी पडलेल्या व्यक्तीकरिता नुकसान भरपाई निधी २०१४ या नियमानुसार दंडाची रक्कम देणेबाबतच्या मागणीचे एक लेखी निवेदन लोकप्रतिनिधींनी दिनांक २३ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांना दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) निवेदनात नमूद केल्याप्रमाणे दंडाची रक्कमेबाबत कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई शहरातील म्हाडाच्या वसाहतीचा पुनर्विकास प्रलंबित असल्याबाबत

**(४३) * २३४९६ श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.नारायण राणे, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.अनिल परब, श्री.सुनिल तटकरे, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील मोडकळीस आलेल्या व जीर्ण झालेल्या चाळींचे नवनिर्माण करणारे गृहनिर्माण धोरण शासनाने दिनांक २ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास जाहीर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या धोरणाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे व या धोरणामुळे किती जुन्या इमारतींच्या पुनर्विकासाचा प्रश्न मार्गी लागणे तसेच मुंबई शहरात म्हाडा व महानगरपालिकेच्या दिरंगाईमुळे म्हाडाच्या ५६ वसाहतींचा पुनर्विकास प्रकल्प प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुनर्विकास प्रलंबित असल्याने रहिवाश्यांना विकासकाकडून मिळणारे भाडे दिले जात नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, म्हाडाच्या वसाहतीच्या पुनर्विकासाच्या कामास कधीपर्यंत सुरु होण्याचे अपेक्षित आहे व सदर कामाकरिता निविदा मागविण्यात आल्या आहेत काय, तसेच त्याचे काम कोणत्या विकासकाकडे सोपविण्यात आले आहे व त्याकरिता कितीची निविदा मंजूर करण्यात आली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) घाटकोपर येथे दिनांक २ सप्टेंबर, २०१६ रोजी झालेल्या जाहीर सभेत घोषित केले आहे.

(२) सदर धोरणामध्ये मुंबईतील म्हाडा वसाहतींच्या पुनर्विकासाबाबत सुधारीत धोरण, संक्रमण शिबिरे तसेच मुंबई उपनगरातील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुनर्विकासाबाबतचे नविन धोरण इत्यादी मुद्दे समाविष्ट आहेत. मुंबईतील जुन्या इमारती तसेच म्हाडा वसाहतींच्या पुनर्विकासासंदर्भातील विकास नियंत्रण नियमावलीतील प्रचलित तरतुदीनुसार पुनर्विकासाची कार्यवाही करण्यात येते. म्हाडा वसाहतींच्या पुनर्विकासासंदर्भात म्हाडा व महानगरपालिकेमध्ये बैठकीद्वारे समन्वये साधण्यात आला आहे.

(३) व (४) म्हाडा वसाहतींचा पुनर्विकास सध्या अस्तित्वात असलेल्या व लागू असलेल्या विकास नियंत्रण नियमावलीमधील तरतुदीनुसार सुरु आहे. तसेच पुनर्विकासासाठी संस्थेतर्फे विकासक नेमण्यात येतात. त्यामुळे निविदा मागविण्यांचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कल्याण तालुक्यातून वाहणाऱ्या वालधुनी नदीच्या विकास व संवर्धनाबाबत**

**(४४) * २४४०४ श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण तालुक्यातुन वाहणा-या वालधुनी नदीच्या विकास व संवर्धनाबाबतचा सविस्तर प्रकल्प अहवाल दिनांक ३ ऑगस्ट, २०११ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, ठाणे यांच्यामार्फत शासनास सादर केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नदीच्या विकासासंबंधी विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मा. नगरविकास राज्यमंत्री यांनी वालधुनी नदीतील अतिक्रमणे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून काढून टाकण्यात येतील व जलसंपदा विभागाच्या माध्यमातून नदी पात्राची खोली व रुंदी वाढवण्यासाठी शासन कार्यवाही करेल असे आश्वासन या सार्वभौम सभागृहात दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.नगरविकास राज्यमंत्री महोदयांनी दिलेल्या आश्वासनानुसार शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) या विषयासंदर्भात दिनांक ११ मार्च, २०१६ रोजी सभागृहात चर्चा झालेल्या लक्षवेधी सूचनेवरील लेखी उत्तरात “वालधुनी नदीच्या संवर्धन व संरक्षणाबाबतची कार्यवाही संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याकडून होणे अपेक्षित आहे. तसेच नागरी क्षेत्रातील या नदीच्या संवर्धन व संरक्षणाबाबत संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनी सुयोग्य आर्थिक माध्यमाद्वारे निधी उपलब्ध करुन घेऊन सदर नदीचे संवर्धन व संरक्षण करणे आवश्यक आहे" असे नमूद करण्यात आले आहे.

(३) व (४) वालधुनी नदी विकास, संरक्षण व संवर्धनासाठी नगर विकासाच्या अनुषंगाने सविस्तर सूचना संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था/नियोजन प्राधिकरण यांना देण्याबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

-----------------

## नागपूर शहरातील वाहनतळाकरिता आरक्षित असलेल्या जागेवर अनधिकृत बांधकाम केल्याबाबत

**(४५) * २५४८५ श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील धंतोली, रामदासपेठ परिसरातील अनेक वसाहतींनी मूळ मंजूर नकाशामध्ये वाहनतळाकरिता आरक्षित असलेल्या जागेवर अनधिकृत बांधकाम केले असल्याचे दिनांक २६ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक रहिवाश्यांनी याबाबत मा.उच्च न्यायालयात दाद मागितली होती ज्यावर मा.उच्च न्यायालयाने स्थानिक महानगरपालिकेला प्रत्येक महिन्याला या अनधिकृत बांधकामाबाबत अहवाल सादर करावा असा आदेशही दिलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानंतरही स्थानिक महानगरपालिका प्रशासनाने मंजूर वाहनतळावरील अनधिकृत बांधकामे पाडलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मूळ मंजूर नकाशामध्ये वाहनतळाकरीता आरक्षित असलेल्या जागेवर केलेले अनधिकृत बांधकाम महानगरपालिका त्वरीत निष्कासित करणार आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३), (४) व (५) मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक १५ ऑक्टोबर, २०१५ च्या आदेशानुसार धंतोली झोन, महानगरपालिका कार्यालयातर्फे करण्यात आलेल्या एकूण २०५ इमारतीच्या सर्वेक्षणाअंती ४४ इमारतीमध्ये मंजूर वाहनतळाच्या जागेत अनधिकृत बांधकाम आढळून आले असून, त्यापैकी ४३ अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यात आलेली आहेत व एका बांधकाम धारकाने शासनाकडे अपिल सादर केलेले आहे. महापालिकेने केलेल्या या कार्यवाहीबाबतची माहिती महापालिकेकडून मा.उच्च न्यायालयात वेळोवेळी सादर करण्यात येत आहे.

-----------------

**मौजे एरंडगाव (जि.बीड) मधील मातंग बांधवांच्या शेतीची नासधुस केल्याबाबत**

**(४६) * २४८३५ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे एरंडगाव (जि.बीड) येथील मातंग समाजाने १० एकर गायरान जमिनीवर घेतलेल्या पिकात जनावरे घालून ते पिक नष्ट करण्यात आल्याची तक्रार गेवराई पोलीस ठाण्यात करण्यात आली असल्याचे दिनांक ३ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तक्रारीची शासनाने चौकशी करून दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मौजे एरंडगाव शिवारातील गट नं. १७७ मधील एकुण ९ हेक्टर, ३० आर गायरान जमिनीवरील सोयाबीन, बाजरी व तुरीचे पिक कापलेले व खुरडलेले असून सदर पिकांची नासधुस केलेली आहे.

(२) सदर प्रकरणी पोलीस ठाणे गेवराई येथे गु.र.नं. २२९/२०१६ भा.दं.वि.कलम १४३, ४४७, ४२७, ५०६ सह ३ (१) (५), ३ (१) (१०) अजाजअप्रका सह ३ (१) (r) (s) (g),३ (z) (va) अजाजअप्रका सुधारणा कायदा २०१५ प्रमाणे ८ आरोपीविरुध्द गुन्हा दाखल असून सदर गुन्ह्यामध्ये १ आरोपीस अटक करण्यात आली असून उर्वरित ७ आरोपीतांना अटक पूर्व जामीन मिळाला आहे. सदर गुन्ह्यात आरोपीविरुध्द चॅप्टर केस क्र.१७०/२०१६ कलम १०७ सीआरपीसी प्रमाणे दिनांक १०/०९/२०१६ रोजी मा. विशेष कार्यकारी दंडाधिकारी तथा स्था.गु.शा. बीड यांचे कडे प्रतिबंधक कार्यवाही करण्यात आलेली असून सदर गुन्ह्यामधील आरोपी क्र.१ ते ८ यांच्याविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात येत आहे.

(३) विलंब झालेला नाही.

-----------------

## महाबळेश्वर, पोलादपुर (जि.रायगड) येथे दिशा डायरेक्ट कंपनीने मध्यमवर्गीय गुंतवणूकदारांची केलेली फसवणूक

**(४७) * २६०९५ श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाबळेश्वर, पोलादपुर (जि.रायगड) येथे दिशा डायरेक्ट कंपनीने सेकंड होमचे आमिष दाखवून मध्यमवर्गीय गुंतवणूकदारांना फसविल्याचे दिनांक १७ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील कंपनीने गुंतवणूकदारांकडून कोट्यवधी रुपये घेवूनही नवीन महाबळेश्वर, पोलादपुरच्या भूखंडाचा ताबा दिला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मध्यमवर्गीय गुंतवणूकदारांची फसवणूक करणाऱ्या कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) महाबळेश्वर, पोलादपूर (जि.रायगड) येथे दिशा डायरेक्ट कंपनीने सेकंड होमचे आमिष दाखवून मध्यमवर्गीय गुंतवणूकदारांना फसविल्याबाबत रायगड व सातारा जिल्हा पोलीस कार्यक्षेत्रात कोणत्याही प्रकारचा गुन्हा अथवा तक्रार अर्ज दाखल नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**यवत (ता.दौंड, जि.पुणे) येथील महिला बचत गटाची झालेली फसवणूक**

**(४८) * २४७४८ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवत (ता.दौंड, जि.पुणे) येथील महिलांचे बचत गट तयार करुन त्यांना व्यक्तिगत लाभासाठी रुपये ५ ते ७ लाख कर्ज १ ते २ टक्क्याने मिळवून देण्याचे आमिष दाखवून ४२ महिलांची एकूण १४ लाख ७०० रुपयांची फसवणूक केल्याचा गुन्हा यवत पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी दोन आरोपींविरुध्द यवत पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे गु.र.नं.५५४/२०१६ भा.दं.वि. कलम ४२०, ३४ प्रमाणे दिनांक १३ ऑगस्ट, २०१६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्यातील एका आरोपीस अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्याचे तपासात आरोपीचे मुंढवा, केशवनगर पुणे येथील ऑफिसची झडती घेवून महिला बचत गटाचे पासबुक तसेच चेक्स व बचतगटातील महिलांचे करारनामे जप्त करण्यात आलेले आहेत. तसेच सदर गुन्ह्यातील दुसऱ्या आरोपीस अटक करण्याची कार्यवाही चालू आहे. गुन्हा तपासावर आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, यांच्या मानधनात वाढ करण्याबाबत

**(४९) * २५८०५ श्री.गोपिकिशन बाजोरीया : तारांकित प्रश्न क्रमांक १६२०३ ला दिनांक ६ एप्रिल, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य यांच्या मानधनात वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावावर शासनस्तरावर केव्हापर्यंत अंमलबजावणी करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) नगरसेवकांच्या मानधनात वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

जिल्हा परिषद/पंचायत समिती सदस्यांना मानधन दिले जात नाही. परंतु त्यांना प्रवासभत्ता दिला जातो. त्यामुळे जिल्हा परिषद/पंचायत समिती सदस्यांना मानधन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर शहरातील डेंग्यू, मलेरिया तसेच कावीळ या आजारांच्या साथीवर आळा घालणेबाबत

**(५०) * २५२३७ प्रा.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील पूर्व व उत्तर भागात डेंग्यू, मलेरिया तसेच कावीळ या आजाराची साथ मोठ्या प्रमाणात पसरली असल्याचे आणि लक्ष्मीनगर, नेहरुनगर, गांधीबाग, धरमपेठ, हनुमानगर विभागामध्ये १,२९६ घरांमध्ये डेंग्यूच्या अळ्या आढळून आल्याची घटना दिनांक २७ जुलै, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर साथीवर आळा घालण्यासाठी शासनाने काय उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अशंत: खरे आहे.

महापालिकेच्या आरोग्य विभागामार्फत जुलै,२०१६ मध्ये राबविण्यात आलेल्या मोहिमेमध्ये या परिमंडळातील एकूण घरापैकी ११०२ घरामध्ये डासअळी आढळून आल्या असून त्या वेळीच नष्ट करण्यात आल्या आहेत. या मोहिमध्ये खालीप्रमाणे बाधीत रुग्ण असल्याचे महापालिकेच्या पथकाला आढळून आलेले आहेत.

| | लकडगंज | धंतोली | मंगळवारी झोन | नेहरुनगर झोन (गुरुदेवनगर) |
|---|---|---|---|---|
| मलेरिया | ०१ | -- | -- | -- |
| डेंग्यू | -- | ०१ | ०२ | -- |
| कावीळ | -- | -- | -- | ०४ |

(२) व (३) शासनाच्या मार्गदर्शक सुचनानुसार महापालिकेकडून (१) किटकनाशक फवारणी (२) धुरफवारणी (३) कंटेनर सर्वे करणे (४) जैविक कार्यक्रम राबविणे (गप्पी मासे सोडणे) इ. कार्यवाही वेळच्यावेळी करण्यात येते व केलेली आहे.

या शिवाय साथीचे आजारासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून नागपूर महानगरपालिकेडून सतत, जनजागृती करणे, शाळा-कॉलेजमध्ये, गर्दीच्या ठिकाणी प्रात्याक्षिके, आजाराविषयीची माहिती देणे, घरोघरी जावून तपासणी इ.कार्यक्रम राबविले जात आहेत.

-----------------

**नक्षलग्रस्त भागासाठी तसेच मुंबई पोलिसांसाठी अत्याधुनिक पध्दतीचे बुलेटप्रुफ जॅकेट पुरविण्याबाबत**

**(५१) * २४३३५ श्री.जयवंतराव जाधव : दिनांक ३ ऑगस्ट, २०१६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ३ मधील प्रश्न क्रमांक १८५५७ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा पोलीस अधीक्षक, गडचिरोली यांनी नक्षलग्रस्त कारवायांचा मुकाबला करण्यासाठी हलक्या वजनाचे नवीन पध्दतीचे बुलेटप्रुफ जॅकेट मिळण्यासाठी पाठविलेला प्रस्ताव माहे फेब्रुवारी, २०१६ पर्यंत शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गडचिरोली जिल्ह्यात बुलेटप्रुफ चिलखताविना नक्षलविरोधी मोहीम राबविली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबई पोलिसांसाठी अत्याधुनिक बुलेटप्रुफ जॅकेट पुरविण्याची बाब गत अनेक दिवसांपासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून नक्षलग्रस्त भागासाठी तसेच मुंबई पोलिसांसाठी अत्याधुनिक पध्दतीचे बुलेटप्रुफ जॅकेट पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) गडचिरोली पोलीस दलाकडे ५१५ नग बुलेटप्रुफ जॅकेट उपलब्ध असून वाटप केलेले आहेत. परंतु वजनाने फार जड असल्याने नक्षलविरोधी अभियान कामी वापरण्यास सुलभ नाहीत. त्यासाठी हलक्या वजनाचे व चांगल्या प्रतीचे बुलेटप्रुफ जॅकेट मागणी संदर्भात प्रस्ताव सादर करण्यात आलेले आहे. सन २०१०-११ मध्ये मुंबई पोलिसांसाठी एकूण ५४४ नग बुलेटप्रुफ जॅकेट पुरविण्यात आलेले आहेत. तसेच निविदा प्रक्रिया पूर्ण होताच पोलीस आयुक्त, मुंबई शहर यांना बुलेटप्रुफ जॅकेट पुरविण्याची तजविज ठेवली आहे.

महाराष्ट्र पोलीस दलासाठी ५००० नग बुलेटप्रुफ जॅकेट खरेदी करण्यासाठी पोलीस महासंचालक कार्यालयाकडून नवीन विनिर्देशानुसार दि.०४/०६/२०१५ पासून निविदा प्रसिध्द करण्यात आली आहे. निविदेमध्ये भाग घेतलेल्या निविदाकारांनी सादर केलेल्या सॅम्पलची Ballistic आणि Tumbling तपासणी करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गेवराई (जि.बीड) नगरपरिषदेतील गैरव्यवहाराबाबत

**(५२) * २३८३६ श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक २२६११ ला दिनांक ३ ऑगस्ट, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गेवराई (जि.बीड) नगरपरिषदेतील गैरव्यवहारातील विविध प्रकरणाबाबत एक महिन्यात चौकशी करण्याचे शासनाने आश्वासन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत सदस्यांनी दिनांक १६ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, बीड यांना लेखी पत्र देऊन चौकशीची मागणी केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नगरपरिषदेतील गैरकारभाराबाबत झालेल्या चौकशीचे निष्कर्ष कोणते, तद्नुसार दोषीविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) गेवराई नगरपरिषदे जवळील हुतात्मा स्मृतीस्तंभ व बोगस शौचालये दाखवून अनुदानाचा अपहार या मुद्दयांबाबत एक महिन्यात चौकशी अहवाल घेण्यात येईल असे लक्षवेधी सूचना क्र.१३८० च्या निवेदनात नमूद केलेले आहे.
(२) होय.
(३) मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद यांच्या गेवराई नगरपरिषदे संबंधित गैरव्यवहाराबाबतच्या निवेदनातील ३५ मुद्दयांच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी यांनी २ मुद्दे वगळता इतर सर्व मुद्दयाबाबत उपविभागीय अधिकारी, बीड यांनी सादर केलेल्या अभिप्रायाशी सहमत असल्याचे व सदर चौकशीअंती फौजदारी स्वरूपाची कार्यवाही करण्याची अथवा नगरपालिका बरखास्त करण्याची आवश्यकता दिसून येत नसल्याबाबत अहवाल सादर केलेला आहे.

या अहवालाच्या अनुषंगाने खालील ३ मुद्दयांबाबत मागविण्यात आलेल्या अहवालाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, बीड यांनी पुढील प्रमाणे सादर केले आहे.

अ) उक्त निवेदनातील मुद्दा क्रमांक २६ मध्ये नमूद रस्त्यांची कामे यथारोग्यरित्या पूर्ण झालेली आहेत

ब) घनकचरा व्यवस्थापनासाठीच्या जागेत संरक्षक भिंतीचे बांधकाम जिल्हाधिकारी कार्यालयाची मान्यता घेऊन केले असल्याचे व सदर शासकीय जागा हस्तांतरणाबाबत अभिलेख अदयावत करुन घेण्याच्या सूचना मुख्याधिकारी यांना देण्यात येत असल्याचे कळविले आहे.

क) हुतात्मा स्मृतीस्तंभाबाबत जिल्हाधिकारी यांनी अहवाल सादर करण्यास कालावधी देण्याची विनंती केलेली आहे.

प्रभाग क्र.५ मध्ये २ कुटुंबात अनुक्रमे १३ व १४ व्यक्ती असल्याने दोन शौचालयाची आवश्यकता असल्याची मागणी करण्यात आली होती. सदर शौचालयासाठीचे अनुदान थेट लाभार्थ्यांच्या बॅक खात्यात जमा केल्याचे नमूद करुन मुख्याधिकारी यांनी सादर केलेला अहवाल यथायोग्य असल्याचे जिल्हाधिकारी यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कुर्ला येथील एसआरए अंतर्गत येणाऱ्या डायमंड महाराष्ट्र कॉम्प्लेक्स को.ऑ.सो. या योजनेत झालेला गैरव्यवहार**

**(५३) * २३७७७ श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एल.बी.एस. रोड, कुर्ला येथील न.भू.क्र. ८ पै, ५७७, ५७८, ५७९, ५८० व ५८१ पै भुखंडावर मे.एन.के. कन्स्ट्रक्शन वर्क्स या विकासकाकडून एसआरए अंतर्गत डायमंड महाराष्ट्र कॉम्प्लेक्स को.ऑ.सो. या योजनेबाबत एस.आर.ए. कडे अनेक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेत संस्थेचा मुख्य प्रवर्तक हा तेथील झोपडीधारक नसणे, तेथे वास्तव्यास नसलेल्या लोकांचा समावेश असणे, विकासकाने सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रातील व L.O.I. मधील योजनेच्या क्षेत्रफळात तफावत असणे, या योजनेच्या ८० टक्के भाग हा उपजिल्हाधिकारी वांद्रे यांच्या अखत्यारीत येत असताना उपजिल्हाधिकारी, कुर्ला यांनी सदर योजनेचा सर्व्हे करणे अशा अनियमितता झालेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेतील विकासकाची आर्थिक पत तपासण्यात आली होती काय,

(४) असल्यास, याबाबत एस.आर.ए. व उपजिल्हाधिकारी अति / निष्का यांचेकडून काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) सदरहू झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबद्दल महाराष्ट्र चाळ कमिटी रहिवाशी कुर्ला व इतर रहिवाश्यांच्या तक्रारी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास प्राप्त झालेल्या आहेत.

(२) सदरहू योजनेचा प्रस्ताव दाखल करतेवेळी परिशिष्ट-२ मध्ये नसलेले श्री.शरद गाडगे यांचे नांव मुख्य प्रवर्तक म्हणून नमूद होते. तथापि, दिनांक २/९/२००९ रोजी पात्र सदस्यांच्या झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेत परिशिष्ट-२ वर अनुक्रमांक ७० वर नमूद असलेले श्री.रामचंद्र मारुती भुत्ते यांची मुख्य प्रवर्तक म्हणून निवड झालेली आहे.

सदर योजनेस दिनांक २७/७/२०१२ रोजी प्रथम आशयपत्र देताना ९८०२.४१ चौ.मी. क्षेत्र विचारात घेतले आहे. तद्नंतर नगर भूमापन अधिकारी, कुर्ला यांनी या योजनेअंतर्गत क्षेत्राचे प्रत्यक्ष मोजणी केल्यानंतर त्यांनी प्रमाणित केलेल्या १०९५७.४० चौ.मी. क्षेत्राच्या आधारे सुधारित आशयपत्र दिनांक २६/६/२०१४ रोजी देण्यात आलेले आहे.

वर नमूद केल्याप्रमाणे सदरहू योजनेचे परिशिष्ट-२ उप जिल्हाधिकारी (अति/निष्का) तथा सक्षम प्राधिकारी, कुर्ला यांनी निर्गमित केले आहे. तथापि, या योजनेतील अंतर्भूत न.भू.क्र.८ पै ही मिळकत अंधेरी तालुक्यातील असून ते क्षेत्र उप जिल्हाधिकारी (अति/निष्का) तथा सक्षम प्राधिकारी, बांद्रा यांच्या कार्यक्षेत्रात आहे, ही वस्तुस्थिती आहे.

(३) सदरहू झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या विकासकाची झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मानकाप्रमाणे वित्तीय क्षमता तपासून परिशिष्ट-३ निर्गमित करण्यात आले आहे.

(४) महाराष्ट्र चाळ कमिटी रहिवाशी कुर्ला यांच्या दिनांक २०/२/२०१६ रोजीच्या तक्रारीस अनुसरुन मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा यांच्याकडे दिनांक २९/७/२०१६ रोजी सुनावणी आयोजित केली होती. तथापि, तक्रारदाराच्या विनंतीवरुन ती सुनावणी पुढे ढकलण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील करी रोड येथील विकासकाने वन अविघ्न पार्क इमारत उभारताना केलेला गैरव्यवहार

**(५४) * २३८६२ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील करी रोड येथील विकासकाने म्हाडा अधिकाऱ्यांशी संगनमत करून वन अविघ्न पार्क हा ५४ मजली टॉवर उभारताना एफएसआय मध्ये गैरप्रकार करून शासनाला सुमारे २ हजार कोटींना फसविल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या इमारतीच्या ५४ मजल्यापैकी ३९ मजले अनधिकृत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करून संबंधित विकासक व या गैरव्यवहारात सहभागी असलेल्या म्हाडा अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत गैरव्यवहार केलेल्या अधिकाऱ्याची अतिरिक्त आयुक्त पदावर नियुक्ती केल्याबाबत

**(५५) * २५६५६ श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.ख्वाजा बेग : तारांकित प्रश्न क्रमांक २२०४४ ला दिनांक ३ ऑगस्ट, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत उपायुक्त पदी काम करीत असताना श्री.संजय घरत यांनी अनेक बेकायदेशीर कामे, गैरव्यवहार केल्याप्रकरणी त्यांचेविरोधात पोलीस ठाण्यात दाखल झालेले फौजदारी गुन्हे शासनाला माहिती असूनही काही लोकप्रतिनिधींनी दिनांक ६ जानेवारी, २०१५ रोजी श्री.संजय घरत यांना केडीएमसी मध्ये अतिरिक्त आयुक्त म्हणून नेमल्याबाबत शिफारसपत्र दिल्याने या भ्रष्ट अधिकाऱ्याची नेमणूक अतिरिक्त आयुक्त पदावर करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिफारसपत्र देणाऱ्या लोकप्रतिनिधींची नावे काय आहेत, तसेच या महानगरपालिकेमध्ये सन १९९५ सालापासून कार्यरत असताना श्री.संजय घरत यांनी केलेल्या अनेक गैरव्यवहारांबद्दल त्यांना बजावण्यात आलेल्या ८ ते १० कारणे दाखवा नोटीसा, तसेच महानगरपालिका आयुक्तांनी श्री.घरत यांच्याविरोधात अनेक तक्रारी असल्याने त्यांची चौकशी होणे गरजेचे असून पालिकेत कार्यरत ठेवणे उचित होणार नसल्याचा अहवाल नगरविकास विभागाला लेखी पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संजय घरत यांच्याविरोधात केडीएमसी मध्ये त्यांनी केलेल्या गैरप्रकाराविरोधात सुरु असलेली चौकशी त्यांना अतिरिक्त आयुक्त पदी नेमल्यामुळे चौकशी अधिकारी त्यांच्या दबावाखाली येऊन काम करु शकणार नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१) अतिरिक्त आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका या पदावर निवड समितीने शिफारस केल्यानुसार, श्री संजय घरत यांची दिनांक ०२/०६/२०१५ च्या शासन आदेशान्वये नियुक्ती करण्यात आलेली आहे.

(२) होय

(३) हे खरे नाही.

(४) व (५) याबाबत आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांनी सादर केलेला अहवाल शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

## मुंबई विमानतळ परिसरातील नियमांचे उल्लंघन करणाऱ्या इमारतींवर कारवाई करुन त्यातील रहिवाशांचे पुनर्वसन करणेबाबत

**(५६) * २५५२७ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विमानतळ परिसरात इमारतींच्या उंचीवर मर्यादा असतानाही नियमांचे उल्लंघन करून उंच मजले चढविलेल्या ६० इमारतींना विमानतळ प्राधिकरणाने नोटीस बजावली असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन या इमारतींच्या विकासकांवर फौजदारी खटले भरण्याबाबत व या इमारतींमध्ये राहणाऱ्या रहिवाशांच्या पुनर्वसनासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) या संदर्भात डायरेक्टर जनरल, सिव्हील एव्हीशन यांचेकडून नोटीसा बजावणेत आलेल्या आहेत.
(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी दि एअरक्राफ्ट (डिमॉलिशन व ऑबस्ट्रक्शन कॉज्ड बाय बिल्डिंग ॲण्ड ट्रीज) रूल्स १९९४ अंतर्गत कारवाई प्रस्तावित आहे. याबाबत निश्चित वस्तूस्थितीची पडताळणी करून संबंधित प्राधिकरणाकडून पुढील कार्यवाहीची दिशा ठरविणेत येत आहे.

-----------------

**वांद्रे कोले कल्याण येथील नवजीवन सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या लाभधारकांना इतर झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पांमध्ये पात्र ठरविल्याबाबत**

**(५७) * २४१५० ॲड.अनिल परब :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वांद्रे कोले कल्याण येथील नवजीवन सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या झोपु प्रकल्पात मोफत घर मिळालेल्या काहीना बसेरा, जयहिंद, राजीव गांधी नगर किंवा भारतनगर रहिवाशी एकता या झोपु प्रकल्पांच्या पात्रतेच्या परिशिष्ट-२ यादीतही पात्र ठरविण्यात आल्याचे माहे सप्टेबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान माहितीच्या अधिकारात मिळविलेल्या माहितीवरुन निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एका झोपडपटी पुनर्वसन प्रकल्पात (एसआरए) मोफत घराचा लाभ मिळालेला असतानाही सहा झोपडीधारक लगतच्या दुसऱ्या प्रकल्पात सुध्दा पात्र ठरले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, झोपु प्रकल्पात मोफत मिळालेले घर दहा वर्षे विकता येत नसतानाही जवळपास ४० ते ४५ टक्के घरांची बेकायदा विक्री केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीत दोषी आढळुन आलेल्यांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) होय.
(२) नवजीवन सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या परिशिष्ट-२ मध्ये पात्र झालेले ६ झोपडीधारक अन्य संस्थांच्या परिशिष्ट-२ मध्ये पात्र असल्याचे निदर्शनास आले

आहे. या ६ झोपडीधारकांना नवजीवन सहकारी गृहनिर्माण संस्थेमध्ये मोफत सदनिका वाटप झाली असली तरी अन्य संस्थेमध्ये त्यांना सदनिकांचे वाटप करण्यात आलेले नाही.

(३) व (४) मा.मुंबई उच्च न्यायालयाने रिट याचिका क्रमांक १६८५/२०१४ व जनहित याचिका क्रमांक ११९/२००९ यामध्ये झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील पुनर्वसन इमारतीमध्ये अवैध राहणाऱ्या रहिवाश्यांच्या विरोधात कारवाई करण्याचे निदेश दिलेले आहेत. सदर ओदशाच्या अंमलबजावणीसाठी प्राधिकरणामार्फत पुनर्वसन इमारतीचे सर्वेक्षण सुरु असून ८६४८० सदनिकांच्या सर्वेक्षणातून १२३२४ सदनिकांमध्ये मूळ लाभार्थी वास्तव्य करीत नसल्याचे आढळून आले आहेत.

यासंदर्भात महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि.व पु.) अधिनियम, १९७१ च्या कलम ३ ई च्या तरतुदीनुसार अवैध वास्तव्य करणाऱ्या रहिवाश्यांविरुध्द कारवाई संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांकडून करण्यात येत आहे. यामध्ये आतापर्यंत १५३८ प्रकरणामध्ये निष्कासनाचे आदेश निर्गमित केले असून ८१३ प्रकरणामध्ये सुनावणी पूर्ण केलेली आहे. १८९७ प्रकरणांमध्ये सुनावणी सुरु असून १०४० प्रकरणे शिल्लक आहेत. ५ प्रकरणांमध्ये निष्कासनाची कारवाई पूर्ण झाली आहे.

(५) वरीलप्रमाणे कारवाई सुरु असल्यामुळे विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डोंबिवली औद्योगिक क्षेत्रातील प्रोबेस एंटरप्रायजेस या कंपनीत झालेल्या स्फोटाच्या चौकशीबाबत

**(५८) * २३५४४ श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर : तारांकित प्रश्न क्रमांक १९८८९ ला दिनांक २७ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवलीतील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ परिसरातील स्फोटामध्ये तब्बल १२ जणांच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या प्रोबेस एंटरप्रायझेस या केमिकल कंपनीत झालेल्या स्फोटाची चौकशी योग्यरित्या झाली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डोंबिवलीतील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ परिसरातील रोजगारासह सुरक्षेतेच्या प्रश्नाकडे शासनाकडून दुर्लक्ष केल्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, डोंबिवलीतील प्रोबेस स्फोटाची चौकशी योग्यरित्या न करण्यामागची शासनाने आपली भुमिका स्पष्ट करुन त्यानुसार उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) नाही.

डोंबिवली एमआयडीसी परिसरातील मे. प्रोबेस एन्टरप्रायझेस या कारखान्यात झालेल्या स्फोटाची सखोल चौकशी करण्याकरीता व अशा घटनांची पूनरावृत्ती होऊ नये याकरीता उपाययोजना सुचविण्याकरीता शासन परिपत्रक दि.२७/०५/२०१६ अन्वये जिल्हाधिकारी ठाणे यांच्या अध्यक्षतेखाली एक तज्ञ समिती स्थापन करण्यात आली आहे. सदर समितीचा अहवाल प्रतिक्षाधीन आहे.
(२) नाही

डोंबिवली एमआयडीसी परिसरातील एकूण ४३७ नोंदणीकृत कारखान्यांपैकी अतिधोकादायक, धोकादायक व रासायनिक असे एकूण २६९ कारखाने आहेत त्यापैकी माहे ऑक्टोंबर, २०१६ पर्यंत १४६ कारखान्यांचे निरिक्षण झाले असून सर्व कारखाना व्यवस्थापनास सुरक्षितेबाबत लेखी सूचना देण्यात आल्या आहेत. उर्वरित कारखान्यांचे निरीक्षण डिसेंबर, २०१६ अखेरपर्यंत करण्यात येईल.

सदर घटनेनंतर नागरीकांकडून असंतोष निर्माण झाल्याबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार प्राप्त झालेली नाही.

(३) डोंबिवली एमआयडीसी परिसरातील मे. प्रोबेस एन्टरप्रायझेस या कारखान्यात झालेल्या स्फोटाची सखोल चौकशी करण्याकरीता व अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये याकरीता उपाययोजना सुचविण्याकरीता शासन परिपत्रक दिनांक २७/०५/२०१६ अन्वये जिल्हाधिकारी ठाणे यांच्या अध्यक्षतेखाली एक तज्ञ समिती स्थापन करण्यात आली आहे.

औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, कल्याण यांनी मे. प्रोबेस एन्टरप्रायझेस या कारखान्याच्या भोगवटादाराविरुध्द कारखाने अधिनियम, १९४८ व महाराष्ट्र कारखाने नियम १९६३ अंतर्गत एकूण चार फौजदारी खटले मुख्य न्याय दंडाधिकारी, ठाणे यांचे न्यायालयात दाखल केले आहेत.

या व्यतिरिक्त पोलीस विभागाकडून सदर घटनेच्या अनुषंगाने मानपाडा पोलीस ठाण्यात गु.र.नं. २७९/२०१६ अन्वये भारतीय दंड संहिताचे कलम ३०४ (२) ३३७, ३३८ व ४२७ प्रमाणे मे. प्रोबेस एन्टरप्रायझेसच्या मालकविरुध्द गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

--------------

**मुंबई शहरातून गत तीन वर्षांपासून बेपत्ता झालेल्या तरुणींच्या तपासाबाबत**

**(५९) * २४४६५ श्री.प्रकाश गजभिये, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातून दिनांक १ जानेवारी, २०१३ ते दिनांक ३१ मार्च, २०१६ या तीन वर्षाच्या कालावधीत सुमारे १८६३४ तरुणी बेपत्ता झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील बेपत्ता तरुण-तरुणी पैंकी किती जणांचा तपास लागला आहे,

(४) तसेच, उक्त तरुण-तरुणीचा तपास लावण्याचे दृष्टीने पोलीस विभागाने कोणते प्रयत्न केले वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

बृहन्मुंबईतील उक्त कालावधीत एकूण १७९७६ मुली/तरुणी/स्त्रिया बेपत्ता झाल्या आहेत.

(२) बेपत्ता तरुणींचा शोध घेण्याकरीता विशेष मोहिम राबविण्यात येते. तसेच बिनतारी संदेश प्रसारीत करुन पोलीस परिपत्रकात प्रसिध्दी देऊन हरविलेल्या तरुणींचा शोध घेण्यासाठी सर्व पोलीस ठाणेंना अवगत करण्यात येते.

(३) बेपत्ता पैकी एकूण १६,८७० तरुणी/स्त्रियांचा तपास लागला आहे.

(४) हरविलेल्या मुली/तरुणी/स्त्रिया यांच्या शोधासाठी दुरदर्शनवर फोटो प्रसिध्द करण्याकरीता पाठविले जातात व फोटो प्रसिध्द झाल्याची खात्री केली जाते. तसेच त्यांची माहिती गॅझेटमध्ये प्रसिध्द केली जाते हरविलेल्या व्यक्तींची माहिती फोटोसहित www.mumbaipolice.maharastra.gov.in या संकेत स्थळावर भरण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**काशिमीरा आणि मिरारोड परिसरात बोगस कॉलसेंटर उघडून अमेरिकन नागरिकांची फसवणूक केल्याबाबत**

**(६०) * २५९०८ श्री.रविंद्र फाटक, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नारायण राणे, श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काशिमीरा आणि मिरारोड परिसरात सुमारे ७ बोगस कॉलसेंटर्स उघडून ६५०० अमेरिकन नागरिकांना ३०० ते ४०० कोटी रुपयांना फसवणूक करणाऱ्या हायटेक टोळीला ठाणे पोलिसांनी दिनांक ०४ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास अटक केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या धाडीत ८५१ हार्डडिस्क, हायस्पीड सर्व्हर, डीव्हीडी, लॅपटॉप असा १ कोटीचा मुद्देमाल जप्त केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) सदरहू प्रकरणी खालील प्रमाणे ३ गुन्हे नोंद करण्यात आले आहेत.

१) काशिमीरा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ५९६/२०१६, भा.दं.वि. कलम ४१९, ४२०, ३८४, १२० (ब), ४६८, ४७०, ४७१, २०१ सह इंडीयन टेलीग्राफ ॲक्टचे कलम २५(क), तसेच माहिती तंत्रज्ञान कायदा २००८ चे कलम ६६(क), ६६(ड), ७२, ७५

२) नयानगर पोलीस ठाणे मध्ये (अ) ३३४/२०१६ भा.दं.वि. कलम ४१९, ४२०, ३८४, ३४, १२०(ब) सह माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६(ब), ६६(क), ७२(१), ७५ प्रमाणे व (ब) ३३५/२०१६ भा.दं.वि. कलम ४१९, ४२०, ३८४, ४६८, ४७०, ४७१, १२०(ब) सह माहिती तंत्रज्ञान ६६(क), ६६(ड), ७२, ७५ व सह इंडीयन टेलीग्राफ ॲक्टचे कलम २५(अ) प्रमाणे आहे.

वरील गुन्हयांमध्ये घटनास्थळी ७२ व अद्यापपर्यंत एकूण ८० आरोपींना अटक करण्यात आली असून कॉल सेंटरमध्ये काम करणारे एकूण ५२२ व्यक्तींना तपासाकामी हजर राहण्याबाबत समज देऊन सोडून देण्यात आलेले आहे. तसेच कॉलसेंटर चालविण्यासाठी वापरण्यात आलेल्या संगणकामधील हार्डडिस्क, सर्व्हर,

मॅजिक जॅक, डीव्हीआर, मोबाईल फोन, वेगवेगळी इलेक्ट्रॉनिक्स तांत्रिक उपकरणे, इतर साधनसामुग्री, कागदपत्रे जप्त करण्यात आलेली आहेत व प्रस्तुतचे प्रकरण तपासाधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**जव्हार (जि.पालघर) नगरपालिकेच्या व्यायाम शाळेची दुरवस्था झाल्याबाबत**

**(६१) * २६१८७ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (ता. जि.पालघर) नगरपालिकेची व्यायामशाळा अतिशय जीर्ण, मोडकळीस आली असून व्यायाम शाळेतील भिंतीस तडे जाऊन व्यायाम शाळेची दुरवस्था झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर व्यायाम शाळेला दारे, खिडक्या नसणे सिलिंगचे प्लॅस्टर नसणे तसेच व्यायाम शाळेच्या समोर उघड्यावर सोडलेल्या सांडपाणीमुळे सदर ठिकाणी अतिशय दुर्गंधी व घाण पसरली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर नगरपालिकेच्या व्यायामशाळेची देखभाल, दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) जूना राजवाडा व एस.टी स्टॅन्ड समोरील खेळाच्या मैदानावरील दोन व्यायाम शाळेपैकी एस.टी स्टॅन्ड समोरील खेळाच्या मैदानावरील व्यायामशाळेची दुरवस्था झालेली आहे.

(२) सदर व्यायामशाळेची दारे, खिडक्या, सिलिंग, प्लॅस्टर इत्यादी जीर्ण झाले आहे, हे खरे आहे. तथापि, सांडपाण्यामुळे दुर्गंधी व घाण पसरली आहे. हे खरे नाही.

(३) दिनांक २७/११/२०१५ रोजी मा. पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या निर्णयानुसार व्यायामशाळेच्या इमारतीच्या बांधकामाला लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेअंतर्गत जिल्हाधिकारी यांचेकडून प्रशासकीय मान्यता प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही नगरपालिका, जव्हार यांचेकडून करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## ठाणे जिल्ह्यातील धोकादायक इमारतींच्या पुनर्विकासाबाबत

**(६२) * २३६३३ श्री.नारायण राणे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यात मोडकळीस आलेल्या इमारतींची संख्या जवळपास साडे तीन हजारांच्या आसपास असून जिल्ह्यातील जवळपास १० लाख लोक या धोकादायक इमारतींमध्ये वास्तव्यास असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भिवंडीत दिनांक ०८ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास गैबीनगर भागात दुमजली इमारत कोसळून ९ जणाचा बळी गेला असताना पुन्हा एक दुमजली ईमारत कोसळून ८ जण ठार व ४ जखमी झाल्याची घटना माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घडली असून त्यामुळे भिवंडीतील धोकादायक इमारतींचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून प्रचलित नियमावलीत या बेकायदा इमारतींचा पुनर्विकास शक्य नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठाणे शहरातील अतिधोकादायक इमारती रिकाम्या केल्यानंतरही तेथील रहिवाशांचा घरावरील हक्क अबाधित राहणार असल्याचा निर्णय दिनांक ११ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.पालकमंत्री यांनी घेतला आहे, तसेच या प्रकरणी संबंधित विकासकाला रहिवासी प्रमाणपत्र देणे बंधनकारक करण्यात आले तसे न केल्यास नविन इमारत बांधण्यासाठी आवश्यक असणाऱ्या परवानग्या व प्रमाणपत्र विकासकांना मिळणार नाही तर अतिधोकादायक इमारत रिकामी केल्यापासून ते त्यांच्या पुनर्वसनाची जबाबदारी संबंधित महापालिकांची असणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ठाणे जिल्ह्यातील धोकादायक इमारतींच्या पुनर्विकासाचा प्रश्न सोडविण्याबाबत व प्रश्न भाग (२) मध्ये नमूद केलेल्या दुर्घटनेतील मृत व्यक्तींच्या नातेवाईकांना व जखमी व्यक्तींना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) ठाणे जिल्ह्यातील महानगरपालिका नगरपालिकांमध्ये ४१९६ धोकादायक व ३५६ अतिधोकादायक इमारती आहेत.

(२) अंशत: खरे आहे,

दिनांक ३१/०७/२०१६ रोजी गैबीनगर भागात घर नं. १०८१ नागांव येथील इमारत कोसळून ८ व्यक्तींचा मृत्यु झाला व ३ व्यक्ती जखमी झाले.

दिनांक ०७/०८/२०१६ रोजी नविन कणेरी, खदान रोड इमारती कोसळून ८ व्यक्तींचा मृत्यु झाला १ व्यक्ती जखमी झाली.

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावालीनुसार धोकादायक, भाडोत्रीव्याप्त, पडलेल्या इत्यादी इमारतींच्या पुनर्बांधणी प्रस्तावामध्ये अतिरिक्त चटई क्षेत्र मंजूर करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

(३) याविषयी दिनांक १२/०८/२०१६ रोजीच्या बैठकीत मा. पालकमंत्री, जि.ठाणे यांनी धोकादायक इमारतींवर तातडीने कार्यवाही करुन धोकादायक इमारती रिकाम्या करताना रहिवाशांना प्रमाणपत्र देण्यात यावे असे निर्देश दिले आहेत .

दिनांक ०५/११/२०१५ च्या शासन परिपत्रकानुसार इमारत निष्कासित करण्यापूर्वी भाडेकरु/सदनिकाधारक यांच्या ताब्यात असलेल्या सदनिकांचे चटई क्षेत्रफळ मोजून त्यांना त्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

धोकादायक इमारती निष्कासित करताना तेथील रहिवाशांचा घरांवरील हक्क अबाधित रहावा, याबाबत तरतुद करण्यात आलेली आहे. त्यानुसार महानगरपालिकेची इमारत निष्कासित करावयाची असल्यास रहिवाशांचे पुनर्वसन महानगरपालिकेमार्फत करण्यात येते.

खाजगी इमारतीमधील रहिवाश्यांच्या पुनर्वसनाची जबाबदारी संबंधित विकासकाची असेल.

(४) दिनांक ३१/०७/२०१६ रोजी गैबीनगर येथील इमारत कोसळून मृत व्यक्तींच्या वारसांना दिनांक १३/०८/२०१६ रोजी रुपये १ लाख इतकी आर्थिक मदत देण्यात आली.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांनी मृत व्यक्तींच्या वारसदारांना प्रत्येकी रुपये ५०,००० व जखमी व्यक्तींना प्रत्येकी रुपये २५,०००/- इतकी मदत देण्याचा निर्णय घेतला आहे.

दिनांक ०७/०८/२०१६ रोजी इमारत कोसळून मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तींना मुख्यमंत्री सहाय्यता निधी देण्याकरीता प्रस्ताव सादर करण्यात आला असल्याचे जिल्हाधिकारी, ठाणे यांनी कळविले आहे.

धोकादायक इमारतींचा समावेश क्लस्टरमध्ये करुन त्यांचा पुनर्विकास करण्याची तरतुद असलेली नागरी पुनर्निर्माण समुह योजनेची प्रारुप नियमावली तयार करण्यात आली असून याबाबत हरकती व सूचना प्रसिध्द करण्यात आल्या आहेत. उक्त बाब न्यायप्रविष्ठ आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुख्याधिकारी, कणकवली नगरपंचायत व कंत्राटदारांनी निविदा अर्जातील अटी शर्तींचा भंग करून गैरव्यवहार केल्याबाबत**

**(६३) * २५३५७ ॲड.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कणकवली नगरपंचायतीतील मुख्याधिकारी यांनी कंत्राटदार श्री.मिथून नंदकिशोर ठाणेकर व श्री.परशुराम सुर्यकांत दळवी यांना रुपये ११,९६,८९०/- व ३७,४०,०००/- ची देयके कंत्राटदारांनी निविदा अर्जातील अटी शर्तींचा भंग केल्यानंतरही चुकीच्या पध्दतीने अदा केल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त दोन्ही कंत्राटदारांनी निविदा अर्जातील अटी शर्ती मधून सेवा कर भरण्याची अट रद्द करुन शासनाचा रुपये १० लाख रकमेचा सेवा कर कायमस्वरुपी बुडविलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुख्याधिकारी, कणकवली नगरपंचायत यांनी केलेल्या गैरकारभाराबाबत तसेच शासनाचा सेवाकर बुडविणाऱ्या दोन्ही कंत्राटदारांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही,

निविदेतील नमूद दराने संबंधीत ठेकेदारांनी सादर केलेल्या देयकानुसारच नगरपचायतीने देयके अदा केलेली आहेत.

(२) हे खरे नाही,

केंद्र शासनाच्या अधिसूचनेनुसार घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या सेवा व पाणी पुरवठा विषयक पुरविण्यात येणाऱ्या सेवा यांना सेवा कर लागू नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

**मौजे रुकडी (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथील डॉक्टर दांपत्यांची निर्घृण हत्या झाल्याची घटना**

**(६४) * २५४९७ श्री.रामराव वडकुते, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे रुकडी (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथील डॉक्टर दांपत्याची निर्घृण हत्या झाल्याची घटना दिनांक ९ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत त्यात काय आढळून आले व तद्नुसार हत्या करणाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी शितल अदिनाथ खोत यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन हातकणंगले पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुध्द गु.र.नं. १९९/२०१६ भा.दं.वि.सं. कलम ३०२, ३९२, ४४९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदर गुन्ह्याचा तपास स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, कोल्हापूर यांच्यामार्फत चालू आहे.

(३) विलंब झालेला नाही.

-----------------

**राज्यातील विविध शहरे नियमित हवाईसेवेद्वारे जोडण्याबाबत**

**(६५) * २५५८७ श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे : तारांकित प्रश्न क्रमांक १४७७० ला दिनांक ३० मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध शहरे नियमित हवाईसेवेद्वारे जोडण्याबाबत केंद्र शासनाच्या प्रस्तावित धोरणाशी सुसंगत धोरण आखण्याची कार्यवाही शासनाकडून पुर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, राज्यात कोणकोणत्या शहरात हवाई सेवा सुरु करण्याचा निर्णय शासनाने घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) असल्यास, राज्याच्या हवाई वाहतुकीबाबतचे शासनाने धोरण तयार केले आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.

(२) राष्ट्रीय विमान वाहतूक धोरणाअंतर्गत शासनमार्फत “Regional Connectivity Scheme” ही योजना राबविण्यात येणार आहे. या संदर्भात राज्य शासन, केंद्र शासन व भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांच्यामध्ये दिनांक २३ ऑगस्ट, २०१६ रोजी सामंजस्य करार करण्यात आला आहे. या योजनेअंतर्गत शिर्डी, अमरावती, गोंदिया, नाशिक, जळगांव, नांदेड, सोलापूर, कोल्हापूर, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग ह्या विमानतळांचा समावेश आहे.

(३) व (४) हवाई वाहतुक धोरण तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**मुंबई शहरातील बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकासाबाबत**

**(६६) * २३७२१ श्री.किरण पावसकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.रविंद्र फाटक, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील वरळी, नायगांव, ना.म.जोशी मार्गावरील बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकास आराखडयास शासनाने तत्वत: मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील ९३ एकर जमिनीवर असलेल्या बीडीडी चाळीतील सुमारे १७ हजार रहिवाशांना ५०० फुटांचे घर मोफत देण्याची शिफारस शासनाने नेमलेल्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षेखालील उच्चाधिकार समितीने केली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या पुनर्विकासाकरीता किती विकासकांची नेमणूक करण्यात आली आहे तसेच, याबाबत रहिवाश्यांबरोबर तसेच त्यांच्या संघटनाबरोबर चर्चा करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) मुंबई शहरातील बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकासासंदर्भात दिनांक ३०/०३/२०१६ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे.

(२) सदर चाळींचा पुनर्विकास प्रकल्प योग्यरितीने राबविण्यासाठी म्हाडास मार्गदर्शन करण्याकरीता मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली शक्ती प्रदत्त समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीने अशा प्रकारची कोणतीही शिफारस केलेली नाही.

तथापि, सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार सदर पुनर्विकासाबाबत दिनांक २६.०८.२०१६ रोजी बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीमध्ये नविन विनियम ३३(९) (ब) अंतर्भूत करण्याकरिता प्रारुप अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली असून, त्यामध्ये पुनर्वसन सदनिकेचे चटई क्षेत्र ४६.४५ चौ.मी. इतके दर्शविण्यात आलेले आहे.

(३) बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकासाकरीता विकासकाची नेमणूक अद्याप करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक शहरातील वाढत्या गुन्हेगारीस आळा घालण्याबाबत

**(६७) * २३६२१ डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहर हद्दीत गुन्हेगारी घटनांमध्ये वाढ होऊन दिनांक १ जानेवारी, २०१६ ते ३१ जुलै, २०१६ या कालावधीत २७ खुन, ९ दरोडा, ४७ जबरी चोरी, ६३ चेन स्नॅचिंग, २८ दिवसा घरफोडी, १३३ रात्री घरफोडी, २६७ इतर चोऱ्यांचे, अवैधरित्या शस्त्र बाळगणे, दुचाकी चोरी, वाहन जाळपोळ, चोरी, अपहरण इत्यादी गुन्हे घडल्याचे निदर्शनास आले असून नाशिकमध्ये गुन्हेगारी वाढत असण्याचे निकर्ष "नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोने" (एनसीआरबी) माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान सादर केलेल्या अहवालातुन स्पष्ट झाले आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, उपरोक्त घडलेल्या गुन्ह्यांपैकी तब्बल ७१ टक्के गुन्ह्यांचा शोध लागलेला नसल्याचे दिनांक १२ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून मुंबई, पुणे व नाशिक या सुवर्ण त्रिकोणातील अन्य दोन शहरांपेक्षा नाशिकमधील खुनाचे प्रमाण अधिक असल्याचे ह्या अहवालात नमुद आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पोलीस यंत्रणेकडून गुन्हेगारांवर कठोर कारवाई होत नसल्यामुळे गुन्हेगारांची गुन्हे करण्याची प्रवृत्तीमध्ये वाढ झाल्यामुळे गंभीर स्थिती निर्माण झाल्याने स्थानिक नागरिकांकडून सार्वत्रिक तक्रार करण्यांत येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गुन्हेगारीस आळा घालण्याचे दृष्टीने कोणती प्रभावी व कठोर प्रतिबंधात्मक कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) अशा प्रकारचा सन २०१६ चा एनसीआरबीचा अहवाल अद्याप पावेतो प्रसिध्द झालेला नाही. तथापि नाशिक शहरात दिनांक ०१ जानेवारी, २०१६ ते ३१ जुलै, २०१६ या कालावधीत खुनाच्या एकुण २६ गुन्ह्यांपैकी २५ गुन्हे उघड झाले आहेत. त्याचप्रमाणे दरोडा ८ पैकी ७, जबरी चोऱ्या ४७ पैकी १६, चैन स्नॅचिंग ६३ पैकी २२, दिवसा घरफोडी २८ पैकी ७,

रात्री घरफोडी ११३ पैकी २८, इतर चोऱ्या २६७ पैकी ७७, अवैधरित्या शस्त्र बाळगणे ३० पैकी २७, दुचाकी चोरी २८९ पैकी ५६, वाहन जाळपोळ १४ पैकी ९, सर्व चोऱ्या ५८८ पैकी १३८, अपहरण १०७ पैकी ६९ इत्यादी गुन्हे उघड झाले आहेत. एकुण सर्व गुन्हे विचारात घेता, १५८० पैकी ४८१ गुन्हे उघडकीस आले असून त्याचे एकुण प्रमाण ३०.४४ टक्के आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

सदर गुन्हे रोखण्याकरीता संबधित आरोपीवर एमपीडीए, मोक्का कायदा, एमपीआयडी तडीपार कारवाई करण्यात येत आहे. नागरिकांमध्ये प्रबोधन होण्यासाठी जास्तीत-जास्त बैठका, प्रतिसाद ॲप व पोलीस मित्राची मदत व गुप्त बातमीदारांकडून माहिती घेतली जात आहे. तसेच महत्वाच्या ठिकाणी सीसीटिव्ही कॅमेरे व सशस्त्र बंदोबस्त लावण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे बीट मार्शल, चौकी अंमलदार व पेट्रोलींग मोबाईल्स यांना प्रभावी पेट्रोलींग करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. रेकॉर्डवरील व गंभीर गुन्हयातील गुन्हेगारांवर नजर ठेवून आवश्यकतेनुसार प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येत आहे.

(५) विलंब झालेला नाही.

-----------------

**बोरीवली येथील शाहीन या इमारतीतील रहिवाश्यांच्या समस्येबाबत**

**(६८) * २४९४५ श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरीवली येथील भगवती हॉस्पिटलसमोरील शाहीन ही इमारत धोकादायक ठरवून विकासक श्रीहरी यांनी महापालिकेशी संगनमत करून तीन वर्षापूर्वी निष्कासित केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तीन वर्ष होऊनही रहिवाश्यांना ११ महिन्यांचे कराराप्रमाणे भाडे न देणे तसेच इमारत बांधण्याबाबत कोणतीच कार्यवाही विकासकांकडून केली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत इमारतीच्या ज्येष्ठ रहिवाश्यांनी मा.मुख्यमंत्री यांना माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान आपल्या मागण्यांचे निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सदर इमारत महानगरपालिकेने मार्च, २०१६ मध्ये निष्कासित केली आहे.

(२) विकासक श्री.दिव्येश देसाई यांनी सदर इमारतींच्या पुनर्विकासाचा प्रस्ताव दिनांक २०/११/२०१४ रोजी सादर केला होता. त्यानुषंगाने आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्याबाबत विकासकास दिनांक २४/११/२०१४ रोजी कळविण्यात आले होते.

तथापि, विकासकाने आवश्यक कागदपत्रांची पूर्तता न केल्यामुळे सदर प्रस्ताव महानगपालिकेमार्फत दफ्तरी दाखल करण्यात आला आहे.

(३) याबाबतचे निवेदन मुख्यमंत्री कार्यालयास प्राप्त झालेले नाही.

(४) व (५) बृहन्मुंबई महानगरपालिकेने सदर इमारत मार्च, २०१६ निष्कासित केली असल्याकारणाने महानगरपालिकेमार्फत सदर प्रकरणी चौकशी करण्यात आलेली नाही.

-----------------

## भिवंडी पोलीस वसाहतीतील इमारतीची झालेली दुरवस्था

**(६९) * २३५३२ श्री.जयंत पाटील, श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी पोलीस वसाहतीमध्ये एकूण ३५० पोलीस कुटुंबे राहत असून या इमारतीच्या भिंतीला तडे गेले असून त्या इमारती राहण्यासाठी अत्यंत धोकादायक झाल्या असल्याचे माहे सप्टेबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीस नियंत्रण कक्षालगत असणा-या प्रांत कार्यालयाच्या पाठीमागील ५ इमारती महानगरपालिकेच्या प्रशासनाने अति धोकादायक जाहीर केल्या असून पोलीसांची काही कुटुंबे या इमारतीत जीव मुठीत धरून राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार पोलीस कुटुंबियांना सुरक्षित निवासस्थाने देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) ठाणे पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ-२, भिवंडी येथे भादवड पोलीस लाईन, जुनी पोलीस लाईन, नवीन पोलीस लाईन, टिळक चौक पोलीस लाईन अशा एकूण ४ पोलीस वसाहती असून त्यामध्ये २०१ पोलीस कर्मचारी वास्तव्यास आहेत.

उपरोक्त वसाहतींपैकी नवीन पोलीस लाईन, प्रांत कार्यालयाचे जवळ, भिवंडी येथील इमारतीचे सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे यांचेकडून स्ट्रक्चरल ऑडीट करण्यात आले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने पोलीस विभागास लिहिलेल्या दिनांक १६ सप्टेंबर, २०१६ रोजीच्या अहवालानुसार प्रस्तुत वसाहतीमधील इमारती क्रमांक १ ते ३ राहण्यास अयोग्य असून इमारत क्रमांक ४ व ५ धोकादायक असल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने इमारत क्रमांक ४ व ५ रिक्त करण्यात आल्या आहेत.

(३) व (४) इमारत क्रमांक ४ व ५ मधील पोलीस कर्मचाऱ्यांना अन्य पोलीस वसाहतींमध्ये निवासस्थान वाटप करण्यात आले आहे. पोलीस आयुक्त, ठाणे यांच्या मागणीप्रमाणे ४१२ निवासस्थाने महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाकडून बांधण्याचे प्रस्तावित आहे.

-----------------

## भिवंडी तालुक्यातील काळू नदीवरील नांदकर-आंबिवली या जलमार्गावरील होडीचा प्रवास सुरु करण्याबाबत

**(७०) * २३९४७ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी तालुक्यातील काळू नदीवरील नांदकर-आंबिवली या जलमार्गांतर्गत नांदकर, सांगे, किरवली, इताडे, आमणेपाडा, आमणे, बापगाव, मुंठवळ, पिसे, चिराडपाडा, इत्यादी अनेक गावांमधील ग्रामस्थांना जलमार्गाने होडीचा प्रवास सुखकर होण्यासाठी शासनाने सन २०१० मध्ये रुपये ५० लाख खर्चून दोन्ही बाजूंनी जेटींचे बांधकाम केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जलमार्गावर होडीसेवा देणाऱ्या ठेकेदारांना पुर्वीच्या ब्रिटीश कायद्यातील अटी-शर्ती जाचक ठरत असल्याने ठेकेदार लिलाव प्रक्रियेत सहभागी होत नसल्यामुळे तेथील होडीचा जलमार्ग प्रवास बंद झाला असल्याचे दिनांक १८ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, होडीसेवा संदर्भातील अटी व शर्ती शिथील करुन होडीसेवा सुरु करण्याबाबत बहुसंख्य ग्रामपंचायतींनी गटविकास अधिकारी, पंचायत समिती भिवंडी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद ठाणे व मा.ग्रामविकास मंत्री यांना वारंवार निवेदने देऊनही कार्यवाही झाली नसल्याचेही माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, संबंधित सर्व गावकऱ्यांनी वारंवार मागणी करुनही कार्यवाही न होण्याची कारणे काय व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, भिवंडी यांच्या दिनांक २२ नोव्हेंबर, २०१६ रोजीच्या पत्रानुसार भिवंडी तालुक्यातील काळू नदीवरील नांदकर आंबिवली या जलमार्गादरम्यान तरीचा लिलाव जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, भिवंडी यांच्यामार्फत ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्र.नौकाअ-२०१४/प्र.क्र.९३/पंस-७, दिनांक ०२ मे, २०१४ मधील नमुद सुचना व मार्गदर्शनानुसार करण्यात येत आहे.
(३) व (४) नांदकर आंबिवली तरीचा लिलाव दरवर्षीप्रमाणे जिल्हा परिषद बांधकाम उपविभागामार्फत करण्यात येतो. सदर ठिकाणी यापूर्वी हि लिलाव करण्यात आलेला असून सन २०१२-२०१३ करीता लिलाव झालेला होतो. परंतु तद्नंतरच्या लिलावात परवानाधारक बोट मालक सदर अटी पूर्ण करण्यात असमर्थ ठरल्याने लिलाव झालेला नाही. दिनांक २३ नोव्हेंबर, २०१६ रोजी पुन्हा लिलाव घेण्यात आला असून त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

**प्लॅस्टिकचे राष्ट्रध्वज निर्माण करणाऱ्या निर्मिती केंद्रावर कारवाई करण्याबाबत**

**(७१) * २५८१८ श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात दरवर्षी दिनांक २६ जानेवारी व १५ ऑगस्ट, २०१६ रोजी प्लॅस्टिकचे राष्ट्रध्वज विकण्यास बंदी घालण्यात येऊनही प्लॅस्टिकचे राष्ट्रध्वज दरवर्षी विक्रीस आढळून येत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राष्ट्रध्वजाची विटंबना रोखण्याबाबत प्लॅस्टिकचे राष्ट्रध्वज निर्माण करणाऱ्या निर्मिती केंद्रावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) राज्यात दरवर्षी २६ जानेवारी, १ मे व १५ ऑगस्ट या दिवशी प्लॅस्टिक ध्वज वापरु नये तसेच कागदी राष्ट्रध्वजाचा ध्वजसंहितेच्या तरतुदीनुसारच वापर करावा याबाबत सर्व जिल्हाधिकारी व जिल्हा माहिती अधिकारी यांनी दरवर्षी नमुद दिनांकापुर्वी विविध माध्यमांद्वारे प्रसिध्दी देण्याबाबत दिनांक ०१ जानेवारी, २०१५ रोजी परिपत्रक निर्गमित करण्यात आले आहे. तसेच प्लॅस्टिक राष्ट्रध्वजांचा वापर थांबविण्यासाठी जिल्हास्तरावर, तालुकास्तरावर समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. इतस्तत: पडलेले राष्ट्रध्वज गोळा करुन त्याची विल्हेवाट लावण्यासाठी ग्रामपंचायत, नगरपरिषद व महानगरपालिकास्तरावर उचित यंत्रणा निर्माण करण्याबाबत दिनांक १३ ऑगस्ट, २०१५ च्या शासन निर्णयान्वये निर्देश देण्यात आले आहेत.

प्लॅस्टिक राष्ट्रध्वजाच्या निर्मितीस पायबंद घालण्याच्या दृष्टीने त्याचे उत्पादक, विक्रेते तसेच वितरक यांच्यावर यथोचित कारवाई करण्याचे निर्देश दिनांक १४ जुन, २०१४ च्या परिपत्रकान्वये देण्यात आले आहेत. तसेच, प्लॅस्टिक राष्ट्रध्वजाच्या निर्मितीस बंदी आणण्याबाबतचा प्रस्ताव केंद्रीय गृह मंत्रालयास पाठविण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिडकोने भू-संपादन केलेल्या भागात शाळांना भूखंड वाटपाचे असलेले निकष शिथील करण्याबाबत

**(७२) * २५६७२ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील नवी मुंबई व पनवेल शहराजवळील सिडकोने भूसंपादन केलेल्या व शहरीकरण होत असलेल्या ग्रामीण भागात स्वयंअर्थशासित शाळांसाठी जागेचा निकष शिथील करण्याची मागणी स्थानिक ग्रामस्थ व शिक्षण संस्थांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरीकरण वाढत असलेल्या ग्रामीण भागात सिडकोने भू-संपादन केलेल्या भागात शाळांसाठी धोरण आखणे याबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाची भूमिका काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) नवी मुंबईतील विविध संकुलांमध्ये शालेय उपक्रमाकरीता भूखंडाचे वाटप करण्याकरीता सन २०१३-१४ मध्ये नव्याने धोरण मंजूर करतेवेळीस काही स्थानिक शैक्षणिक संस्थांचे प्रतिनिधी, महामंडळाकडे स्थानिक संस्थांना भूखंड वाटपाकरीता निकष शिथील करणेबाबत पाठपुरावा करीत होते.

या सर्व बाबींचा विचार करुन, नवी मुंबईमधील विविध संकुलांमध्ये शालेय उपक्रमाकरिता सर्वसामान्य नागरिकांनी व स्थानिक प्रकल्पबाधीत नागरिकांनी स्थापन केलेल्या संस्थांना शालेय शैक्षणिक उपक्रमाकरिता भूखंड वाटप करण्यासाठी सिडको महामंडळाच्या संचालक मंडळाने दिनांक २/१२/२०१४ रोजी ठराव क्र. ११२३१ अन्वये पारित केलेल्या धोरणास शासनाने दिनांक ०९/०९/२०१४ रोजी मंजूरी दिली आहे. त्यानुसार भूखंड वाटपासाठी पात्रता निकषांची पुर्तता करणाऱ्या सर्वसाधारण नागरिकांनी स्थापन केलेल्या शैक्षणिक संस्थांना नवी मुंबई परिक्षेत्रात एक भूखंड व स्थानिक नवी मुंबई प्रकल्पबाधीत नागरिकांच्या शैक्षणिक संस्थेस गुणांकनामध्ये अधिक प्राधान्य देवून दोन भूखंडाचे वाटप करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारकाबाबत**

**(७३) * २४५४० श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, ॲड.अनिल परब, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील दादर येथील इंदू मिलच्या जागेवर भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्यासाठी इंदू मिलच्या जागेचे शासनाकडे अद्यापही हस्तांतरण झालेले नसल्यामुळे स्मारकाच्या कामात कोणतीही प्रगती होऊ शकलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त स्मारकाच्या सुधारित आराखडयास सामाजिक न्याय विभागाने संमती दिल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर सुधारीत आराखडयाचा तपशील काय आहे,

(४) असल्यास, सदर स्मारकाच्या जागेचे १४१३.४८ कोटी रुपये एवढे मुल्यांकन मान्य करावे अशी विनंती शासनाने केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्रालयास माहे जुलै, २०१६ मध्ये व त्यादरम्यान केलेली असून केंद्र शासनाकडून काही प्रतिसाद मिळाला आहे काय व केंद्र शासनाने यासंदर्भात कोणता निर्णय घेतला आहे आणि तदनुसार उक्त स्मारक उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) इंदू मिलची जागा भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रस्तावित स्मारकासाठी राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाकडून राज्य शासनास हस्तांतर होणेची औपचारिकता बाकी असली तरी त्या ठिकाणी काम करण्याची पूर्ण परवानगी देण्यात आलेली आहे.

प्रस्तावित स्मारकाचे विकासासाठी शासनाने यापूर्वीच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणूक केलेली आहे. प्राधिकरणाने शासनाची मान्यता घेवून नियुक्त केलेले सल्लागार श्री. शशी प्रभू यांचेकडून प्रस्तावित स्मारकाच्या आराखड्याबाबत कार्यवाही सुरु आहे. सर्व संबंधित व्यक्ती आणि संस्था यांच्याशी चर्चा करुन आराखडा अंतिम करण्यासाठी मा.मंत्री (सामाजिक न्याय) यांची एक सदस्यीय समिती दिनांक १४ मार्च, २०१६ रोजी गठीत करण्यात आली आहे. सदर समितीने प्रस्तावित स्मारकाचे संकल्पना आराखडे अंतिम केलेले आहेत.
(३) प्रस्तुत आराखड्यामध्ये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या कास्य धातू आच्छादित ३५० फुट उंचीचा पुतळा, अभ्यागत कक्ष, ग्रंथालय, कलादालन आणि सायक्लोरामा थिएटर, वस्तूसंग्रहालय, बैठक सभागृह, ध्यान धारणेसाठी जागा वगैरे बाबींचा समावेश असून प्रशासकीय कार्यालय, उपहारगृह, स्वच्छतागृह, प्रतिक्षालय वगैरे सुविधांचाही समावेश आहे.
(४) व (५) होय.

राज्य शासनाने सादर केलेल्या प्रस्तावास केंद्र शासनाने मंजूरी दिलेली आहे. याबाबत मा.वस्त्रमंत्री, भारत सरकार यांनी दिनांक ५ सप्टेंबर, २०१६ रोजीचे पत्रान्वये राज्य शासनास कळविलेले आहे. त्याचप्रमाणे वस्त्र मंत्रालय, भारत सरकार यांचेड्न दिनांक ९ नोव्हेंबर, २०१६ रोजीचे पत्रान्वये त्याप्रमाणे राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळास सूचना देणेत आलेल्या आहेत. तसेच सदरची जागा

ताब्यात देणेबाबत राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळास राज्य शासनाकडून दिनांक २१ नोव्हेंबर, २०१६ रोजीचे पत्रान्वये कळविलेले असून सदर जागा शासनाचे वतीने ताब्यात घेणेबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणासही दिनांक २१ नोव्हेंबर, २०१६ रोजीचे पत्रान्वये सूचना देणेत आलेल्या आहेत.

-----------------

## इसिस या दहशदवादी संघटनेत दाखल होण्यासाठी प्रवृत्त करणाऱ्यांवर केरळ पोलीस आणि राज्य दहशतवादविरोधी पथकाने केलेल्या कारवाईबाबत

**(७४) * २५६२५ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केरळमधील युवकांची माथी भडकावून तसेच त्यांचे धर्मांतर करुन सिरियात इसिस या दहशतवादी संघटनेत दाखल होण्यासाठी पाठविणाऱ्या अर्शिद व रिझवान यांना केरळ पोलीस आणि राज्य दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) दिनांक १४ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दोघांचा ताबा गुन्हे शाखेला मिळाला आहे काय, असल्यास, त्यांचेवर कोणत्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला व कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पल्लरीवट्टोम कोची सिटी पोलीस ठाणे, केरळ गु.र.क्र.१०१७/२०१६ कलम १५३ (अ), ३४ भादंवि सह कलम १३ बेकायदेशीर हालचाली प्रतिबंधक कायदा १९६७ सुधारणा २००८ अन्वये दाखल गुन्ह्यातील आरोपी नामे (१) अरशी आासिफ कुरेशी यांना दिनांक २२ जुलै, २०१६ रोजी सीवूड, नवी मुंबई येथून व आरोपी २) रिझवान इलियास खान यास कल्याण (प.) जि.ठाणे येथून दिनांक २३ जुलै, २०१६ रोजी अटक करण्यात आली आहे. सदर आरोपीस अटक करण्याकरीता दहशतवाद विरोधी पथकाकडून केरळ राज्याच्या पोलीसांना योग्य ती कायदेशीर मदत पुरविण्यात आली आहे.

(२) गु.प्र.शा., गु.र.नं.५९/२०१६ (नागपाडा पो.ठाणे गु.र.क्र.२७१/२०१६), कलम १२० ब भा.दं.वि.सह कलम १०, १३, ३८ बेकायदेशीर कारवाया प्रतिबंधक अधिनियम १९६७ या गुन्ह्याच्या तपासामध्ये आरोपी रिझवान खान व अरशी कुरेशी यांचा प्रोडक्शन वॉरन्टवर दिनांक २८ ऑगस्ट, २०१६ रोजी ताबा घेऊन त्यांना नमूद गुन्ह्यामध्ये अटक करण्यात आली. सदर गुन्ह्याचा तपास दिनांक १ ऑक्टोबर, २०१६ रोजीच्या पत्रान्वये राष्ट्रीय तपास यंत्रणेकडे वर्ग करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**शासकीय कर्मचाऱ्यांना होणाऱ्या मारहाणीबाबत**

**(७५) * २३४९९ श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.रामराव वडकुते, श्री.सतिश चव्हाण, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाच्या कर्मचाऱ्यांनी होणाऱ्या मारहाणी संदर्भात कायदा करण्यासाठी दिनांक २२ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास राज्यभर लेखणी बंद आंदोलन केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
महाराष्ट्र राजपत्रित अधिकारी महासंघ यांचेद्वारा राज्यात अधिकारी, कर्मचारी व पोलीस यांचेवर होणाऱ्या मारहाणी व दमबाजीचा निषेध करण्यासाठी दिनांक २० व २१ सप्टेंबर, २०१६ या दोन दिवशी काही राजपत्रित अधिकाऱ्यांनी काळ्या फिती लावून शासकीय कामकाज केले. तसेच दिनांक २२ सप्टेंबर, २०१६ रोजी नियोजित असलेले लेखणीबंद आंदोलन चर्चेअंती स्थगित करण्यात आले.
(२) व (३) राज्यातील शासकीय अधिकारी व कर्मचारी यांना होणाऱ्या मारहाणी प्रकरणी गुन्हे नोंद करण्यात येणाऱ्या भारतीय दंड संहितेच्या कलम ३३२ व ३५३ मध्ये सुधारणा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## मुंबईतील मालाड (पूर्व) कुरार व्हिलेज, पारेखनगर येथील महानगरपालिकेच्या इमारतीत शाळा सुरु करण्याबाबत

**(७६) * २४८३८ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई मालाड पूर्व कुरार व्हीलेज, पारेखनगर येथे मुंबई महापालिकेने मराठी, हिंदी, उर्दु, गुजराती, सेमी इंग्रजी शाळेसाठी पाच हजार विद्यार्थी क्षमतेची इमारत बांधून दोन वर्षे पूर्ण झाली असली तरी सन २०१६ च्या शैक्षणिक सत्रापासून शाळा सुरु करण्यात आली नसल्याचे दिनांक १ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शाळेच्या इमारतीचा उपयोग राजकीय पक्ष कार्यक्रमासाठी करीत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मालाड (पूर्व) कुरार व्हिलेज येथे नवीन बांधण्यात आलेल्या पारेखनगर या महानगरपालिकेच्या शालेय इमारतीमध्ये मराठी व उर्दु माध्यमाच्या शाळा दिनांक २०/०६/२०१६ रोजी व हिंदी माध्यमाच्या शाळा दिनांक २६/०६/२०१६ पासून सुरू करण्यात आलेल्या आहेत.

गुजराती व सेमी इंग्रजी माध्यमाच्या शाळा पूर्वीपासून कुरार व्हिलेज येथील महानगरपालिकेच्या मालकीच्या अन्य इमारतीत सुरू आहेत

(२) सदर शाळेच्या इमारतीचा उपयोग राजकीय पक्ष कार्यक्रमासाठी करीत नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## नागपूर महानगरपालिकेच्या अखत्यारीतील शाळांना दुरुस्तीकरिता निधी उपलब्ध करून देणेबाबत

**(७७) * २५२५८ प्रा.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेच्या अखत्यारीतीतील शाळांना देखभाल दुरुस्तीकरीता निधी उपलब्ध होत नसल्यामुळे शहरातील १८२ शाळा मूलभूत सुविधेपासून वंचित असल्याचे दिनांक २६ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळांना शिक्षण मंडळाने पत्रव्यवहार करुनही निधी उपलब्ध झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त शाळांना शासन निधी केव्हा उपलब्ध करुन देणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

आर्थिक वर्ष २०१५-१६ च्या अर्थसंकल्पात महानगरपालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळांच्या विस्ताराकरीता व दुरुस्ती करीता रुपये २ कोटी ९० लक्ष इतका निधी ठेवण्यात आलेला होता. यापैकी रुपये १ कोटी ४७ लक्ष खर्चास मंजूरी देण्यात आली असून सदरची कामे चालू आहेत.

तसेच आर्थिक वर्ष २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात महानगरपालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळांच्या विस्ताराकरीता व दुरुस्तीकरीता रुपये ५ कोटी ४० लक्ष इतका निधी ठेवण्यात आलेला आहे. यापैकी माहे नोव्हेंबर, २०१६ पर्यंत रुपये २ कोटी ५८ लक्ष खर्चास मंजूरी देण्यात आली असून सदरची कामे चालू आहेत.

सर्व शिक्षा अभियानांतर्गत आर्थिक वर्ष २०१५-१६ मध्ये देखभाल दुरुस्ती अनुदान या लेखाशिर्षा अंतर्गत १७० प्राथमिक आणि ११२ उच्च प्राथमिक शाळांसाठी रुपये २४.८३ लक्ष तरतूद मंजूर करण्यात येऊन यामधून प्रति उच्च प्राथमिक शाळा रुपये १०,०००/- व प्रति प्राथमिक शाळा रुपये ७,५००/- याप्रमाणे एकुण रुपये २४,५७,५००/- सर्व शिक्षा अभियान कार्यालयामार्फत शाळांच्या शाळा सुधार समितीकडे वर्ग करण्यात आले.

तसेच आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये सर्व शिक्षा अभियान प्रकल्पात महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद कार्यालयातून दिनांक ६ ऑक्टोबर, २०१६ ला १४० प्राथमिक व ९४ उच्च प्राथमिक अशा २३४ शाळांसाठी रुपये १७.५५ लक्ष मंजूर तरतुद शाळा व्यवस्थापन समित्यांकडे वर्ग करण्यात आली.

(२) हे अंशत: खरे आहे.

सर्व शिक्षा अभियानामार्फत नियमित देखभाल दुरुस्ती अनुदानासोबतच विशेष देखभाल दुरुस्ती अनुदान (Grant for Major repairs) प्राप्त करण्यासाठी प्रस्ताव शिक्षण विभाग कार्यालयीन पत्र क्र.८७३/शि.वि./२०१६ दिनांक १९/०५/२०१६ अन्वये जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, नागपूर यांना करण्यात आली होती परंतु शासकीय नियमानुसार सदर लाभ महानगरपालिका शाळांना देता येणार नाही, असे त्यांनी सूचित केले.

(३) सर्व शिक्षा अभियानांतर्गत आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये देखभाल दुरुस्ती अनुदान या लेखाशिर्षा अंतर्गत १४० प्राथमिक आणि ९४ उच्च प्राथमिक शाळांसाठी रुपये १७.७५ लक्ष तरतुद मंजूर करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तळेगाव-अजनेरी (ता.त्रंबकेश्वर, जि.नाशिक) व ओतूर (जि.पुणे) या गावातील अल्पवयीन मुलीवर झालेला लैंगिक अत्याचार

**(७८) * २५६१२ श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळेगाव-अजनेरी (ता.त्रंबकेश्वर जि.नाशिक) येथे अल्पवयीन मुलीवर अत्याचार झाल्याची घटना माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घडली असल्याचे तसेच, ओतूर (जि.पुणे) या गावातील एका १३ वर्षीय अल्पवयीन मुलीवर चार जणांनी सामुहिक लैंगिक अत्याचार केल्याचे जुलै, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणातील आरोपींवर कारवाई होत नसल्याने संपुर्ण नाशिक जिल्ह्यात दंगल सदृश्य परिस्थिती निर्माण झाली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त दोन्ही प्रकरणातील आरोपीवर काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) असल्यास, राज्यात दिवसेंदिवस अल्पवयीन मुलीवर वाढलेल्या अत्याचाराच्या घटना रोखण्याकरीता शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) नाही. पोलीसांनी तातडीने गुन्हा दाखल केला आहे.

(३) तळेगाव-अजनेरी येथील बलात्कार प्रकरणी त्र्यंबकेश्वर पोलीस स्टेशन गुनं.१०२/२०१६ भादवि कलम ३७६ (२) (आय), सह कलम लैंगिक अत्याचारापासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ चे कलम ४, ६, ८, १२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीस अटक करण्यात आले असून, आरोपीविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे. गुन्हा न्यायप्रविष्ट आहे.

ओतूर पोलीस स्टेशन गु.र.नं.१७९/२०१६ भादवि कलम ३७६(२)(आय)(एन)(ड) बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक अधिनियम २०१२ चे कलम ४, ६, ८, १० प्रमाणे दिनांक १४ सप्टेंबर, २०१६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्यांतील चारही आरोपींना अटक करण्यात आले असून, तपास सुरु आहे.

(४) महिलांवरील अत्याचार रोखण्याकरीता उपाययोजना:-

सदर गुन्हे रोखण्यासाठी सर्व पोलीस घटकांना पोलीस मित्रांचा जास्तीत जास्त सहभाग घेऊन गुन्हेगारीस आळा घालण्याच्या सुचना दिले आहेत. पोलीस मित्रांकरीता मोबाईल ॲप तयार करण्यात आले आहे. पोलीसगस्त वाढ करण्यात आले आहे. महिलांच्या सुरक्षेसाठी सर्व पोलीस घटकांना मोबाईल ॲप तयार करण्याच्या सूचना दिले आहेत. विनयभंगाच्या गुन्ह्यात दोषारोपपत्र २४ तासांच्या आत दाखल करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. गर्दीचे ठिकाणी, शाळा, महाविद्यालय, धार्मिक स्थळे येथे सी.सी.टी.व्ही. बसविण्यात आले आहेत, जनजागृती शिबीर केले जात आहे, शाळा, कॉलेज येथे कायदेविषयक व वाहतूक नियमाविषयक माहिती दिली जाते, अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याबाबत सर्व घटक प्रमुखांना कळविण्यात आले आहे, महिलांसाठी टोल फ्री हेल्पलाईन नं.१०३ व १०९१ तयार करण्यात आले आहे, महिला सुरक्षा समिती व महिला सहाय्य कक्ष तसेच महिला अत्याचार प्रतिबंधक कक्ष इ.ची स्थापना करण्यात आली आहे, महिलांवरील अत्याचाराची प्रकरणे निकाली काढण्यासाठी २७ विशेष न्यायालयांची स्थापना केली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## पुणे महानगर प्रदेश क्षेत्र प्राधिकरणांतर्गत येणाऱ्या वीस गुंठ्यांच्या आतील प्लॉटधारकांच्या नियमावलीबाबत

**(७९) * २५६६२ श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्याचा नियोजनबध्द विकास व्हावा यासाठी दोन वर्षापूर्वी शासनाने पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची (PMRDA) स्थापना केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीस गुठ्यांच्या आतील प्लॉटधारकांना १५ टक्के सुविधा क्षेत्र आणि १० टक्के मोकळी जागा ठेवण्याच्या बंधनातून वगळावे अशी मागणी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे स्थानिक जनता सातत्याने करत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाची स्थापना दिनांक ३१ मार्च, २०१५ च्या अधिसूचनेद्वारे झाली आहे.
(२) व (३) होय, प्राधिकरण क्षेत्रासाठी पुणे जिल्ह्याच्या प्रादेशिक योजनेची विकास नियंत्रण नियमावली लागू आहे. रहिवास किंवा तत्सम वापराकरीता परवानगी घेतांना १५% सुविधा क्षेत्र व १०% खुली जागा ठेवण्याचा नियम अंतर्भूत आहे त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे. वीस गुंठ्यांच्या आतील प्लॉटधारकांना १५ टक्के सुविधा क्षेत्र आणि १० टक्के मोकळी जागा ठेवण्याच्या बंधनातून वगळावे अशी मागणी करण्यात आलेली आहे. प्राधिकरणाची स्थापना झाल्याने प्राधिकरणास त्यांच्या क्षेत्राची नवीन एकसामाईक व एकत्रित नियमावली तयार करुन सादर करण्याच्या सूचना शासनाने दि.२४/०५/२०१६ व दि.१८/११/२०१६ रोजीच्या पत्रान्वये दिल्या आहेत. यामध्ये सदर बाब समाविष्ट करुन त्याबाबत निर्णय घेण्यात येईल.
(४) लागू नाही.

----------------

**ठाणे महापालिकेमार्फत राबविण्यात येणाऱ्या मलनि:सारण योजनेत गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(८०) * २५५३१ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे महापालिकेमार्फत राबविण्यात येणाऱ्या मलनि:सारण योजनेत गैरव्यवहार झाला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खारेगाव येथील मलनि:सारण केंद्र उभारण्याचा निर्णय घेण्यात आला असून येथेही आरक्षण न बदलताच ठेकेदाराला रुपये ८ कोटी देऊन काम सुरु करण्यात आले असून आरक्षण बदलाचा प्रस्ताव मंजूरीसाठी नगरविकास विभागाकडे दाखल होण्यापूर्वीच मलनि:स्सारण केंद्राचे ४० टक्के बांधकाम झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या गैरव्यवहाराची गंभीर दखल घेत मलनि:सारण केंद्राच्या बांधकामास स्थगिती देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद व स्थानिक लोकप्रतिनिधी यांचेकडून प्राप्त निवेदनानंतर खारेगाव येथील मलनि:सारण प्रकल्पाच्या बांधकामास दिनांक १९/८/२०१६ अन्वये स्थगिती देण्यात आली आहे.
(४) या प्रकरणी आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांचेकडून वस्तुस्थितीदर्शक अहवाल मागविण्यात आला होता. सदर अहवाल शासनास दिनांक २५/१०/२०१६ रोजी प्राप्त झाला असून उक्त प्रकरणी शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वांद्रे (पूर्व) येथील बेहराम पाडा परिसरातील बहुमजली झोपडी कोसळून झालेल्या दुर्घटनेबाबत

**(८१) * २३६३६ श्री.नारायण राणे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वांद्रे (पूर्व) येथील बेहराम पाडा परिसरातील एक बहुमजली झोपडी दिनांक १३ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास कोसळून झालेल्या दुर्घटनेत ६ मुले मृत्यूमुखी पडली तर ५ जण गंभीररीत्या जखमी झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू दुर्घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे

(२) व (३) बेहरामपाडा, वांद्रे (पूर्व) ही जागा रेल्वे प्राधिकरणाच्या अखत्यारीत असल्याने तेथील अनधिकृत बांधकामांवर कार्यवाही करण्याची जबाबदारी ही रेल्वे प्राधिकरणाची आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या दुर्घटना टाळण्यासाठी अनधिकृत बांधकामासंदर्भात आवश्यक कारवाई कालबध्दरित्या करण्याबाबत महानगरपालिकेमार्फत रेल्वे प्राधिकरणास दुर्घटनेपूर्वी दिनांक २१/०७/२०१६ रोजी कळविण्यात आले आहे.

बेहरामपाडा, वांद्रे (पूर्व) येथील अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यासाठी पश्चिम रेल्वे प्रशासनाने आगाऊ मागणी केल्यास त्यासाठी लागणारे मनुष्यबळ व यंत्र सामुग्री महानगरपालिकेमार्फत पुरविण्यात येते.

सदर ठिकाणी अनधिकृत/धोकादायक झोडपे/ बांधकाम कोसळून जीवितहानी व वित्त हानी होऊ नये यासाठी महानगरपालिका व रेल्वे प्रशासनामार्फत १४ फुटांपेक्षा अधिक उंचीच्या झोपड्यांवर निष्कासनाची कारवाई करण्यात येत असून आतापर्यंत १९ अनधिकृत बांधकामे निष्किासित करण्यात आली आहेत.

तसेच, महानगरपालिकेमार्फत बेहरामपाडा येथील ५५ बांधकामांच्या मालक/रहिवाशांना खबरदारीची सूचनापत्रे बजावण्यात आली आहेत.

-----------------

**लोअरपरेल (मुंबई) येथील श्रीनिवास विकासकाने**
**भाडेकरुंची फसवणूक केल्याबाबत**

**(८२) * २५३५८ ॲड.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोअरपरेल (मुंबई) येथील श्रीनिवास मिलच्या भूखंडावर जागतिक किर्तीचा “वर्ल्डवन” हा उत्तुंग टॉवर उभारणाऱ्या विकासकाचे संचालक तसेच अभियंत्यानी तेथील भाडेकरुंची फसवणूक करुन घरे बळकाविली असल्याचे माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मूळ भाडेकरुंची म्हाडाच्या पात्रता यादीत नावे असताना त्यांना अपात्र ठरविण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत दोषी आढळून आलेल्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

लोअर परेल (मुंबई) येथील श्रीनिवास कॉटन मिलच्या भूखंडावरील विकास हा विकास नियंत्रण नियमावलीच्या विनियम ५८ मधील तरतूदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मंजूरीने झालेला आहे.

(२) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

पुनर्वसनाच्या इमारतीचे (तळ+२० मजले) काम पूर्ण करण्यात आलेले असून, सदर इमारतीमध्ये महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकारणाच्या मंडळाने प्रमाणित केलेल्या १३३ भाडेकरू/रहिवाश्यांचे पुनर्वसन करण्यासाठी महानगरपालिकेकडून भोगवटा प्रमाणपत्र दिनांक ६/८/२०१६ रोजी देण्यात आलेले आहे. विकासकाने या सर्व १३३ भाडेकरू/रहिवाश्यांचे पुनर्वसन करण्याचे प्रस्तावित केलेले आहे. १३३ भाडेकरू/रहिवाश्यांनी मा.न्यायालयात दावा दाखल केला असून, त्यांच्यासाठी नवीन इमारतीत पुनर्वसनाच्या सदनिका आरक्षित करून ठेवलेल्या आहेत, असे म्हाडाकडून स्पष्ट करण्यात आलेले आहे.

(३) व (४) बाब उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील पोलिसांच्या घराबाबत

**(८३) * २५५९३ श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे : तारांकित प्रश्न क्रमांक १५४३० ला दिनांक २३ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पोलिसांना चांगल्या वातावरणात राहता यावे यासाठी दोन तीन वर्षात सुमारे एक लाख घरे बांधण्याचे नियोजन करून त्याचा संपुर्ण आराखडा सादर करावा असे निर्देश मा. मुख्यमंत्री यांनी दिनांक १४ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास गृह विभागाच्या बैठकीत दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे, त्यासाठी किती निधीची तरतुद केली आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे. दिनांक १९ नोव्हेंबर, २०१५ रोजीच्या बैठकीमध्ये आगामी काही कालावधीत पोलिसांसाठी सुमारे १ लाख निवासस्थाने बांधण्याचे नियोजन करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

(२) व (३) पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाच्या माध्यमातून व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून पोलिसांसाठी निवासस्थाने बांधण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. त्याकरीता नियमित अर्थसंकल्पीय तरतुदी व्यतिरिक्त कर्जरोखे उभारणी तसेच खाजगी विकासकांच्या माध्यमातून बांधकाम करण्याचे विचाराधीन आहे.

-----------------

**औरंगाबाद येथे शिक्षकांच्या मोर्चावर पोलिसांनी केलेल्या लाठीमाराबाबत**

**(८४) * २३९७२ अॅड.निरंजन डावखरे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.विक्रम काळे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.अमरिशभाई पटेल :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील मंत्रीमंडळ बैठकीच्या निमित्ताने महाराष्ट्र राज्य कायम विनाअनुदानित शाळा कृती समितीने दिनांक ४ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास मोर्चा आयोजित करुन त्यांच्या मागण्यांचे निवेदन मा.मुख्यमंत्री महोदयांना सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनामार्फत आंदोलनकर्त्यांशी संवाद न साधल्यामुळे मोर्च्यास हिंसक वळण लागल्याने मोर्चेकरी शिक्षकांवर पोलिसांनी केलेल्या लाठीमारात अनेक शिक्षक जखमी झाले तसेच एका शिक्षकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानंतर मोर्चेकऱ्यांपैकी अनेक शिक्षकांवर पोलिसांनी गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल करण्यात आल्यामुळे सदरचे शिक्षकांवरील दाखल केलेले गुन्हे रद्द करण्यात यावे अशी मागणी शाळा कृती समिती संघटनेने शासनाकडे दिनांक ६ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी करून संबंधित पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्याविरूध्द गुन्हे नोंदविण्याबाबत व शिक्षकांवरील गुन्हे रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर मोर्चा दरम्यान शिक्षक मोर्चेकरी यांनी प्रक्षोभक वक्तव्य करुन चिथावणी दिल्यामुळे मोर्चेकरी प्रक्षोभक झाले व त्यांनी पोलीस अधिकारी कर्मचारी यांना अरेरावी व धक्काबुक्की करुन दगडफेकी केली व त्यात पोलीस कर्मचारी गंभीर जखमी झाले. सदर परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलीसांनी सौम्य बळाचा वापर केला. त्यामध्ये कोणीही शिक्षक जखमी झाल्याचे तसेच कोणत्याही शिक्षकाचा मृत्यू झाल्याचे तपासात आढळून आले नाही.

(३) व (४) होय हे खरे आहे. मोर्चेक-यापैकी ज्या शिक्षकांनी कायदा हातात घेऊन पोलिसांवर दगडफेक करुन पोलीसांना गंभीर जखमी केले व जनतेच्या मालमत्तेचे नुकसान केल्या प्रकरणी सिटीचौक औरंगाबाद पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ४२२/२०१६ कलम ३०७, ३५३, ३३३, ३३६, ३३७ ३४१, २९४, १४३, १४७, १४८, १४९ भादंवि सह कलम प्रिव्हेंशन ऑफ डॅमेज टू पब्लीक प्रॉपर्टी ॲक्ट १९८४ चे कलम ३, ४ व क्रिमीनल लॉ अमेंन्डमेंट ॲक्ट १९३२ चे कलम ७ सह कलम १३५ मपोका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे. पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्याविरुद्ध कोणत्याही प्रकारची दखलपात्र स्वरुपाची तक्रार प्राप्त झालेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्ह्यात आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारण्याबाबत

**(८५) * २४५४२ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर : तारांकित प्रश्न क्रमांक १५६०१ ला दिनांक ३० मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यात आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारण्याचे प्रस्तावित असून मागील दहा वर्षापासून अनेकवेळा जागेची पाहणी व सर्वेक्षण करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उद्योग, व्यापार-व्यवसायाची मोठ्या प्रमाणात होत असून नवनवीन आंतरराष्ट्रीय कंपन्या देखील गुंतवणुक करीत आहेत, मात्र या विस्तार विकासात आंतरराष्ट्रीय गुंतवणुकीसाठी आंतरराष्ट्रीय विमानतळाअभावी मोठी अडचण निर्माण झालेली असल्यामुळे याठिकाणी आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) पुणे जिल्ह्यात नवीन आंतरराष्ट्रीय विमानतळ विकसित करण्याकरीता सुयोग्य जागा निवडण्यासाठी राज्य शासन व भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांनी सप्टेंबर, २०१६ मध्ये पुण्यातील ६ ठिकाणांची पाहणी केली असून त्याबाबतचा अहवाल सादर केला आहे. त्यानुसार मुंजेवाडी, पारगांव मेमाणे येथील जागा सुयोग्य असल्याचे अहवालात नमूद केले आहे. हे ठिकाण पुणे शहरापासून २८ कि.मी.हवाई अंतरावर आहे. या अहवालाच्या अनुषंगाने महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीमार्फत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**लोटे (ता.खेड, जि.रत्नागिरी) औद्योगिक वसाहतीतील गरुडा केमिकल्स या कंपनीत वायु गळती होऊन कामगाराचा झालेला मृत्यू**

**(८६) * २३७६५ श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोटे (ता.खेड, जि.रत्नागिरी) औद्योगिक वसाहतीतील प्लॉट क्र.बी ४६ मध्ये असलेल्या गरुडा केमिकल्स या कंपनीत माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान वायुगळती होऊन एका कामगाराचा मृत्यू व एक जण गंभीर जखमी झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार मृत्यू पावलेल्या कामगाराच्या कुटुंबियांना शासनातर्फे तसेच कंपनीकडून कोणती आर्थिक मदत देण्यात आली वा येत आहे,

(३) असल्यास, वायू गळतीस जबाबदार असणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) अंशत: खरे आहे.

खेड तालुक्यातील (जि.रत्नागिरी) लोटे औद्योगिक वसाहतीतील गरुडा केमिकल्स, एम.आय.डी.सी.लोटे-परशुराम या कारखान्यात माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान वायुगळती झालेली नाही. दिनांक ११ ऑग्स्ट, २०१६ रोजी दोन कामगारांना काम करत असतांना रसायनाच्या वाफांची बाधा झाली. उपचारादरम्यान एका कामगारांचा मृत्यू झाला व दुसरा कामगार उपचारानंतर बरा होऊन कामावर रुजू झालेला आहे.

(२) होय.

सदर प्रकरणी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, कोल्हापूर तसेच पोलिस विभाग, ता.खेड जि.रत्नागिरी यांनी चौकशी केली आहे.

चौकशीत असे आढळून आले की सदर कारखान्यात इथेलिन ग्लायकॉल मोनो सॅलिसिलेट या रसायनाचे उत्पादन करण्यासाठी टू-क्लोरो इथेनॉल हा कच्चा माल वापरला जातो. घटनेच्या दिवशी दोन कामगार उघड्या कारबॉयमधील टू-क्लोरो इथेनॉल हे रसायन हाताळत असतांना त्या रसायनाच्या वाफा निर्माण झाल्या दोन्ही कामगारांनी सुरक्षा साधने न वापरल्यामुळे त्यांना बाधा झाली.

सदर घटनेत मृत्यू झालेल्या कामगाराच्या कुटुंबियांना कारखाना व्यवस्थापनातर्फे आर्थिक मदत म्हणून सानुग्रह अनुदान रुपये १०,००,०००/- (रु.दहा लाख) अदा करण्यात आले आहेत. तसेच मृत कामगारांच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई मिळण्यासाठी मा.आयुक्त, श्रमिक नुकसान भरपाई यांचेकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

(३) कारखान्याचे भोगवटादाराविरुध्द मुख्य न्यायदंडाधिकारी, रत्नागिरी यांचे न्यायालयात खटला क्र.S.S.C. ११२९/२०१६ दि.०८/११/२०१६ रोजी दाखल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**उत्तमसिंग चव्हाण**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात येत आहे.
मुद्रण: शासकीय मुद्रणालय, नागपूर.